MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

# व्ही.पी.एम्. दिशा

वर्ष चोविसावे / अंक ९ / सप्टेंबर २०२३

## संपादकीय

## आता वेध सूर्याचे

जुलै महिन्याच्या १४ तारखेला इस्रोने चंद्रयान अवकाशात सोडले. आधी पृथ्वीभोवती प्रदक्षिणा घालून हे यान चंद्राच्या कक्षेत शिरले. २३ ऑगस्ट २०२३ रोजी या यानातून विक्रम लंडर वेगळा होऊन चंद्राच्या पृष्ठभागावर अलगद विसावला. हा भारतीयांच्या दृष्टीने अतिशय मोलाचा क्षण होता. सर्वांनी भारतीय अंतरिक्ष संशोधन संस्थेतील तंत्रज्ञांचे या यशासाठी मनभरून कौतूक केले. कौतुकांचा वर्षाव सुरू आहे तेवढ्यातच अंतरिक्ष संस्थेने सूर्ययानाची घोषणा केली. अर्थात यासाठीचे काम अनेक वर्षे चालले होते. ते पूर्ण करून आम्ही सूर्याच्या दिशेने यान प्रक्षेपित करू असे या संस्थेने जाहीर केले. दिलेला शब्द त्यांनी पाळला आणि ठरल्याप्रमाणे सूर्ययान सूर्याकडे झेपावले.

चंद्राप्रमाणे सूर्याच्या पृष्ठभाग शीतल नाही. सूर्याच्या पृष्ठभागापासून थोडे वर असलेल्या परिसरात तापमान सुमारे ५५०० अंश सेल्सिअस इतके असते. सूर्याच्या केंद्राचे कमाल तापमान तर १५० लक्ष अंश सेल्सिअस एवढे असते. अशा स्थितीत कुठलेही अंतराळ यान सूर्याच्या पृष्ठभागावर उतरणे किंवा त्याच्या अगदी जवळ जाणे शक्य नसते. पृथ्वीवर मानवाने बनविलेली अशी कोणतीही वस्तू नाही की जी सूर्याची इतकी प्रचंड उष्णता सहन करू शकेल. म्हणूनच सूर्ययान सूर्यापासून योग्य अंतरावर ठेवणे किंवा योग्य अंतरावरून त्याचे भ्रमण करणे गरजेचे असते. पृथ्वीपासून सूर्याचे अंतर सुमारे १५ कोटी किलोमीटर इतके आहे. कोणत्याही दोन खगोलीय वस्तूमध्ये गुरुत्वाकर्षणाचे बल कार्यरत असते. त्या गुरुत्वाकर्षणामुळेच पृथ्वी सूर्याभोवती आणि चंद्र पृथ्वीभोवती फिरत राहातो. चंद्राच्या गुरुत्वाकर्षण बलामुळेच पृथ्वीवर भरती-ओहोटी येत असते. पण काही बिंदू असे असतात की जिथे दोन्ही खगोलीय वस्तूंचे बल समसमान असते. म्हणजे तिथे असणारी वस्तू कोणत्या एका बाजूने न जाता दोहोंच्यामध्ये स्थिर राहाते.

स्विस गणितज्ज्ञ लिओनार्ड युलर यांनी या बिंदूंची संकल्पना मांडली होती आणि इटालियन फ्रेंच गणितज्ज्ञ जोसेफ लुई लंग्रांज यांनी या बिंदूवर अधिक संशोधन केले. जोसेफ लुई लंग्रांज यांच्या सन्मानार्थ या बिंदूला 'लंग्रांज बिंदू' असे म्हणतात. पृथ्वी व सूर्याच्यामध्ये एल-१,२,३,४ व ५ हे पाच लंग्राज बिंदू आहेत. सूर्य व पृथ्वी हे एका जागी स्थिर राहात नाहीत. तसेच हे पाच बिंदूही नेहमी फिरत असतात. कोणतेही अंतराळ यान या लंग्रांज बिंदूभोवती कक्षेत फिरत ठेवता येते. जेम्स लेन टेलिस्कोप ही अमेरिकेच्या नासाच्या अंतराळ दुर्बीणीने अशाच प्रकारे एल-२ बिंदूभोवती फिरत राहून दूरवरच्या अंतराळातील निरीक्षण नोंदवलेले आहे.

(पृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय**)

अमेरिका, जर्मनी व युरोपीयन स्पेस रिसर्च एजन्सीने सूर्याचा अभ्यास करण्यासाठी अनेक मोहिमा राबविलेल्या आहेत. रशिया व चीननेही सूर्याचा अभ्यास करणारे उपग्रह सोडले होते. या क्षेत्रात आपले पाय रोवण्यासाठी भारताने पुढाकार घ्यायचे ठरविले. त्यासाठी आदित्य हे यान बनविण्याचे योजले गेले. आदित्य हे इंडियन स्पेस रिसर्च ऑर्गनायझेशन अर्थात इस्रो या संस्थेचे सूर्याबद्दल संशोधन करणारे अंतराळ यान आहे. खरे तर ही एक सूर्याभोवती भ्रमण करणारी अवकाश वेधशाळा आहे. ते लांगरांज बिंदू १ भोवती फिरणार आहे. म्हणून या मोहिमेला 'आदित्य एल १' असे संबोधिले जाते. खरे तर आपल्या देशात सूर्य मोहिमेचा विचार १५ वर्षांपूर्वीच करण्यात आला होता.

इ.स.२००८ मध्ये सूर्ययान या यानाच्या उड्डाणाचा आराखडा इस्रोतर्फे तयार करण्यात आला. दि.१० नोव्हेंबर २००८ रोजी त्यास मंजुरी देण्यात आली. या कामासाठी तीन संस्था एकत्र आल्या. इस्रोने यानाची रचना व बांधणी करावी असे ठरले. बंगळूरच्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ एस्ट्रोफिजिक्स कडे या १ मोहीमेची आखणी करण्याचे काम सोपविले गेले. पुण्याच्या इंटर युनिव्हर्सिटी सेंटर फॉर एस्ट्रोनॉमी एन्ड एस्ट्रोफिजिक्स या संस्थेने सोलर अल्ट्रॉ व्हायोलेट इमेजिंग टेलिस्कोप विकसित करण्याची जबाबदारी स्वीकारली. या संस्थांखेरीज भारतातील इतर अनेक सरकारी आणि खाजगी संस्थांनी या मोहिमेत भाग घेतला. विधायक कार्यासाठी सहकार्याचा पायंडाच या मोहिमेमुळे आपल्या देशात पाडला गेला असेच म्हणावे लागेल. या सूर्ययान मोहिमेचे काही ठळक उद्देश खाली दिलेले आहेत.

१) सूर्याच्या आसपासच्या वातावरणाचा अभ्यास करणे.

२) क्रोमोस्फिअरिक व कोरोनल उष्णतेचा अभ्यास करणे. तसेच फ्लेअर्सवर संशोधन करणे.

३) सौर कोरोनाच्या तापमानाची मोजणी करणे.

४) कोरोनल व कोरोनल लूप प्लाझ्माचे निदान करणे. तापमान, वेग व घनता यांची माहिती काढणे.

५) सूर्याच्या आसपासच्या हवेची उत्पत्ती, संरचना व गतिशीलता यांचा अभ्यास करणे.

ही मोहीम यशस्वी झाली तर आपल्या ज्ञानात खूप भर पडणार आहे. या ज्ञानवर्धक मोहिमेची सुरुवात सप्टेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात झाली. शनिवार दि.२ सप्टेंबर २०२३ रोजी सकाळी ११.५० वाजता श्रीहरीकोटा येथील सतीश धवन अंतराळ केंद्रावरून आरएसएलव्ही सी-११ (RSLV-C११) या अग्निबाणाच्या मदतीने आदित्य एल-१ या अंतराळ यानाचे प्रक्षेपण करण्यात आले. चार महिन्यांच्या प्रवासानंतर हे यान आपल्या इच्छित कक्षेत पोहोचेल. वर सांगितल्याप्रमाणे हे यान पृथ्वी व सूर्य यामध्ये असणाऱ्या लंग्रांज बिंदू एल-१ भोवती कक्षेत फिरत राहणार आहे. पृथ्वीपासून या बिंदूचे अंतर सुमारे १५ लाख किलोमीटर आहे. म्हणजे पृथ्वी व चंद्र या दरम्यानच्या अंतरापेक्षा जवळपास चौपट अंतरावर हे सूर्ययान असेल. वेगवेगळ्या कामासाठी बनविलेली सात उपकरणे या यानात आहेत. प्रत्येक उपकरण आपल्याला सूर्याबद्दलची नवनवीन माहिती देणार आहे.

आदित्य एल-१ चे प्रक्षेपण दूरचित्रवाणीवर देशभर दाखविण्यात आले होते. त्यामुळे भारताच्या अंतरिक्ष संशोधन संस्थेची क्षमता काय आहे याची कल्पना सर्वांनाच आली. त्याहीपेक्षा महत्त्वाचे हे की, या क्षेत्रात खूप वाव आहे याची जाणीव महाविद्यालयात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना झाली. विशेष हे की, या मोहिमेची प्रमुख निगर शाजी नावाची एक महिला तंत्रज्ञ होती. अग्निबाणाच्या यशस्वी उड्डाणानंतर त्या बाईने आपले मनोगत व्यक्त केले. त्यात तिच्या चेहऱ्यावरचा आत्मविश्वास स्पष्टपणे दिसत होता. विज्ञान शाखेत अभ्यास करणाऱ्या तरुण मुलींनी तिच्या पावलावर पाऊल ठेवण्याचा प्रयत्न करावा असे या निमित्ताने सुचवावेसे वाटते. अंतरिक्ष क्षेत्रात संशोधनाला भरपूर वाव आहे हे लक्षात घेणे गरजेचे आहे.

**- डॉ. सुधाकर आगरकर**

व्ही.पी.एम्.

# दिशा

वर्ष चोविसावे/अंक ९/सप्टेंबर २०२३

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २८ वे/अंक ३ रा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**
**vpmt1935@gmail.com**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
Email:perfectprints@gmail.com

## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. सुधाकर आगरकर | |
| २) | सुरेश दलाल : कवितालोभाचा पदध्वनी | प्रमोद वसंत बापट | २ |
| ३) | पुराचित्रांचे 'भीम'संशोधक : डॉक्टर हरिभाऊ वाकणकर | विनीता तेलंग | ७ |
| ४) | कायदेशीर सल्ला केंद्रामधील अनुभव : कौटुंबिक संस्था अडचणीत असल्याचा भास | प्रा. विनोद एच वाघ | ११ |
| ५) | सर विल्यम जोन्स आणि इंग्लंडमधली 'मनूस्मृती' | संकेत कुलकर्णी | १४ |
| ६) | साध्या, सखोल कविता... | डॉ. आनंद कुलकर्णी | १६ |
| ७) | एक भरारी... अशीही | युवराज वानखेडे | १९ |
| ८) | श्री वासुदेवानंद सरस्वती | सहा.प्रा. सुभाष गं. शिंदे | २१ |
| ९) | परिसर वार्ता | संकलित | २४ |


या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून, त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# सुरेश दलाल : कवितालोभाचा पदध्वनी

*दिनांक १० ऑगस्ट रोजी ज्येष्ठ गुजराती साहित्यिक सुरेश दलाल यांचा स्मृतिदिन झाला. गुजराती साहित्याला मोठे योगदान देणाऱ्या सुरेश दलाल यांच्यावरील ज्येष्ठ साहित्यिक श्री प्रमोद बापट यांचा लेख - संपादक*

मुंबईतच वाढलो, जगलो. त्यामुळे मायभाषेच्या सोबतीने अन्य चार भाषा कानांवर पडत राहिल्या, मनात भिजत, रुजत राहिल्या.



पहिली गट्टी झाली हिंदीशी. शाळेत तो एक विषयही होता आणि आमच्या सृष्टीत मिसळून गेलेली अत्यंत लाडकी चित्रपटसृष्टी होती. संघाच्या कामामुळे बोलण्याचाही सराव झाला.

दुसरीशी मात्र सलगी झाली. ती होती गुजराती. कारणं लक्षात येत नाहीत. पण झटकन थोडं बालिश वाटू शकेल असं कारण असावं त्यातल्या लोभस उच्चारांनी मनात जागा केली. लसावीत सांगायचं तर 'ळ' च्या उच्चारामुळे ती जवळची होऊन गेली.

गुजराती कानावर पडत असे, खरं तर आदळत असे प्रथम उपनगरी गाडीच्या डब्यात. हे प्रथम श्रवण काही सुखाचं नव्हतं. कधी वाजत्या डब्यात शिरावं लागे. अनेकदा परतीच्या प्रवासात तसे होई. घसा खरवडून बोललेलंही मधुर वाटावं असं त्या भजनी डब्यातलं भजन असे. एकूण गाडीतला गर्दीचा गलका, चपळ झांजांचे नाद यांच्यामध्ये भजनाचे शब्द तर धूसर होऊन जात; पण लावलेले आवाज, त्यांची तारता, स्वराशी वा गात्या समूहाशी नसलेला मेळ यांचा एकत्रित परिणाम सांगीतिक तर खासच नसे. पण तालाच्या आघातात त्याच्याकडे दुर्लक्ष करता येई. एखाद्याच्या गळ्यातून लोकसंगीताची आठवण करून देणारी वेलीसारखी चढत जाणारी लकेर मध्येच कानाला वेढून जाई तेव्हा छान वाटे. थोडं सहनीय होई. पण सामान्यपणे.. थोडं उथळपणेच वाटू लागे. गुजरातचा संगीताशी वैरभाव असावा. पण पंडितजी आठवत. संगीतमार्तंड पं. ओंकारनाथ ठाकूर! आणि गुजरातचा अधिकारही मनात दृढ होई.

बँकेच्या नोकरीत प्रारंभी नेमणूक झाली ती प्रार्थना समाज शाखेत, गिरगावात. खातेदार मंडळीत मराठी माणसांइतकीच गुजराती माणसं होती. तिथे मात्र ह्या भाषेची माधुरी अनुभवास आली. तिथेच गुजरातीत सांगायचं तर 'लागणी' लागली. अनुभूती आली. पुढे ऑपेरा हाऊसच्या शाखेत आलो. चांगलं दशकभर ही लागणी बळावत राहिली. दृढ झाली. पुढची पाच वर्षे थोडा भाषा-सहवास ओसरला. शास्त्री हॉल, फोर्ट अशा जागी बदल्या झाल्या. आणि पुन्हा ह्या भाषाघाटावर भिजता आलं ते काळबादेवी शाखेत आल्यावर. अवती-भवती मोठ्या पेठा..औषधांचा दवा बाजार, सोन्याचांदीचा झवेरी बाजार, आणि कापडाचोपडाच्या मुळजी जेठा-स्वदेशी-मंगलदास या पेठांचा वेढा. त्यामुळे केवळ बँक नव्हे तर सगळ्या आसमंतात गुर्जरीगुंजन सुरू असे.

मरीन लाईन्स रेल्वे स्थानकावरून बँकेकडे जाण्याच्या शामलदास गांधी मार्गावरून येताना उजव्या हाताच्या

दुकानरांगेत एका दुकानासमोर अनेकदा रांगा दिसत. ते दुकान तर अशा औषधं, रत्नं वा कापडाचं नव्हतं. दुकानाच्या फळ्या उघडण्याआधीच लोकांची रांग बघून कुतूहल वाढे. कशासाठी उभी असतील ही माणसं हे काही कळत नसे. त्या दुकानावरची पाटी अजून बुचकळ्यात टाकत असे. ती पाटी होती 'ईमेज पब्लिकेशन प्रा. लि.' अशी होती. आता इथे अशा बाजारात ही प्रकाशन संस्था काय करत असेल याचा प्रकाश काही केल्या पडत नव्हता. आणि ही सारी व्यापारी दिसणारी माणसं या रांगा लावून काय मिळवतात हे कोडं सुटत नसे.




अखेर कोडं सुटलं. एकदा रांगेत आमचा मित्र, संघ कार्यकर्ता कनक त्रिवेदी रांगेत उभा दिसला. त्याची मंगलदास मार्केटमध्ये पेढी आहे. तिथे त्या कापडाच्या पेठेतील दुकानांना 'पेढी' असंच म्हणतात. आपल्या भाषा-व्यवहारात सोन्याचांदीची ती पेढी आणि बाकी सारी दुकाने.. असो. तर आनंदाने त्याच्याशी बोलायला गेलो. त्यातून रांगेचं कोडं सुटणार होतं. तो म्हणाला, 'अरे, एका साहित्यिक कार्यक्रमाच्या प्रवेशिका मिळणार आहेत. त्यासाठी उभा आहे.' मी चकित होऊन ऐकत राहिलो. साहित्यिक कार्यक्रम ? आणि कनकसारखी तिथल्या विविध पेठांतील व्यापारी शेठ माणसं त्याच्या प्रवेशिकांसाठी रांगा लावून उभे राहतात..? माझं कोडं सुटण्याऐवजी गुंता अधिक वाढलाच! गुजराती समाजाविषयीचं माझं आकलन सर्वथा मोडून पडलं. तो समाज केवळ व्यापार करतो असंच आजवर वाटत होतं. पण साहित्यसंस्कृतीशी संबंधित अशा 'अव्यापारेशु व्यापारातही' त्यांना रस होता हे नव्याने समजलं. खूप खोलवर समाधान वाटलं आणि संकुचित समजाचं वैषम्यही...

त्या दिवशी माझी बँक असलेल्या त्या श्यामलदास (अस्सल गुजराती भाषक मात्र श्यामळदास म्हणतात.. हा ळ चा लळा!) गांधी मार्गावर आत शिरण्यासाठी मला आणखी एक ठिकाण सापडलं. तेच ते ईमेज पब्लिकेशनचं दुकान. तेही कनकमुळेच.. त्याच्याकडूनच समजलं तिथे सुरेश दलाल बसतात.

सुरेश पुरुषोत्तमदास दलाल !

गुजराती भाषेतील साहित्य क्षेत्रातील मोठं मातब्बर नाव. आपल्या पाडगांवकरांसारखं ! किंबहुना थोडी अधिक महत्ता असलेलं. प्रतिभासंपन्न कवी, विचक्षण समीक्षक, शैलीदार निबंधकार, साक्षेपी संपादक, चतुर संवादक आणि जुन्या-नव्या एकूणच कवितेचा अनुरक्त भक्त असं अगदी थोडक्यात ज्यांचं वर्णन आधी ऐकून होतो.. ते सुरेश दलाल.

ह्याआधी गिरीशकडून (लेखक-व्याख्याते डॉ. गिरीश दाबके ! सख्खा मामेभाऊच असल्यामुळे अरेतुरेचा व्यवहार) ऐकलं होतं. तो मालाडवासी असल्यामुळे गुर्जर गलबल्यातच तो वाढला. शिशुवयापासूनच मायमराठीबरोबरच गुर्जरीमासीने त्याला लळा लावला. वेगळे कष्ट न करता तो बोलू लागला. पुढे स्वा. सावरकरसाहित्य गुजराती भाषेत अनुवादित करण्याचे लक्ष्य समोर ठेवीत त्याने यत्नपूर्वक गुजराती साहित्याचा व्यासंग वाढविला. कन्हैयालाल मुन्शी, गुणवंतराय आचार्य, चंद्रकांत बक्षी, वर्षा अडाळजा अशा गुजराती भाषेतील कित्येक श्रेष्ठ साहित्यकारांची नावे मी त्याच्याकडूनच प्रथम ऐकली. त्यांच्या साहित्यकृतींची महत्ता समजावून घेतली. त्यात सुरेश दलाल हे एक महत्त्वाचं नाव होतं. त्याने दलालांच्या काही कविताही ऐकवल्या होत्या. त्यांनी केलेले मराठी

विचार कुठूनही घ्यावेत; पण घेताना ते पारखून घ्यावेत.

कवींच्या कवितांच्या अनुवादाविषयीही त्यानेच सांगितलं होतं.


एवंगुणविशिष्ट कविताप्रेमी साहित्यकार आपल्या नित्य येण्या-जाण्याच्या वाटेवर आहे याचं मनोमन समाधान झालं. त्यांचं दर्शन व्हावं, त्यांना भेटावं... अर्थात भेटून काय बोलायचं हा प्रश्नच होता, कारण मी त्यांचं लेखन वाचलं नव्हतं की भाषण ऐकलं नव्हतं. ऐकली होती ती महती. त्यामुळे पाऊल अडलं. शिवाय त्या दिवशी ती दारासमोरची भली मोठी रांग आणि अजूनही न उघडलेलं दार या दोन गोष्टी अनुकूल नव्हत्याच. आज बाहेरूनच कविराय दिसले तर पहावं असं म्हणून कनकबरोबर गप्पा मारीत थोडा वेळ थांबलो. पण थोडाच वेळ थांबता आलं. बँकेची वेळ होत होती. निघायलाच हवं होतं. म्हणून निघालो पण भेट घ्यायचीच अशी खूणगाठ बांधून.




दिवस सरत होते. आता मरीन लाईन्स स्थानकावरून बँकेत जाताना अगदी सुरवातीलाच रस्ता ओलांडून येऊ लागलो. त्यामुळे स्वाभाविकच 'ईमेज'च्या दारापुढून येणं होई. दार क्वचित उघडं दिसे. कुतूहलाने डोकावीत असे आणि पुढे सरत असे. धीर होत नव्हता.

तो एका सुंदर निमित्ताने मिळवून दिला. २००५ या वर्षीचा साहित्य अकादमीचा सन्मान सुरेश दलाल यांना देण्याची वार्ता प्रसिद्ध झाली. बातमीने बळ दिलं. एकदा वाटलं कनकसारख्या कुणालातरी बरोबर घेऊन जावं. पण दिवस, वेळा जमवीत बसावं लागलं असतं. आणि असंही वाटत होतं की सोबत कुणी असलं तर त्यांचं त्यांचं बोलणं होईल. गुजराती भाषेत होईल. आपण बंद ओठांनी बघत राहू. त्यापेक्षा एकट्यानेच मुसंडी मारायची मानसिक तयारी केली.

जवळपास दोन महिने उलटून गेले होते. दलालांचे गुजराती साहित्यजगतातील अभिनंदन सोहळे होत होते. ते थोडे मोकळे झालेत असं पाहून मी जायचं निश्चित केलं. बँकेतील सकाळच्या पहिल्या प्रहरात थोडी गर्दी असते. त्या पहिल्या लाटा ओसरल्यावर जेवायला बाहेर जातोय सांगून बाहेर पडलो. त्यामुळे थोडा अधिक वेळ गाठीशी होता. जवळच ईमेजचं कार्यालय होतं. कविराय होते. टेबलावर काही कागद होते ते खालीवर करणं सुरू होतं. छोटेखानीच पण आटोपशीर वातानुकुलीत.. सुखद कार्यालय. भिंतीवर पुस्तकांची मुखपृष्ठमालिका. उभ्या केलेल्या लोखंडी मांडण्यांवर सुबकपणे पुस्तकं रचलेली. हलक्या आवाजात कुणी दूरध्वनीवर बोलताहेत. मला एक सेवककवजा मुलगा विचारायला आला. मी प्रयोजन सांगितलं. आणि खूप तिष्ठत न बसता थेट कविरायांसमोर स्थानापन्न झालो.




सोबत नेलेला छोटासा गुच्छ त्यांच्या हाती दिला आणि वाकून नमस्कार केला. ते थोडे चमकले.. चक्रावले. सहजपणे वर उठवत मोकळेपणाने हसले. एक मराठी माणूस भेटीला आला त्याचं त्यांना औत्सुक्य वाटत होतं. मी गुजरातमधील डांग येथे झालेल्या शबरी कुंभाची पुस्तिका त्यांना दिली. कुंभ नुकताच झाला होता, आणि गुजरातमध्ये झाला होता. खूप चर्चेतही होता. त्याच्यावर बोलणं झालं असतं तर माझं संवादाचं काम थोडं सोपं झालं असतं. म्हणूनच तशी योजना केली

विचार न करता शिकणे हे निरुपयोगी असते, तर न शिकता विचार करणे हे धोकादायक असते !..

होती. दलालांनी पुस्तिका नीट वेळ देत चाळली..पाहिली. अनेक कृष्णगीतं लिहिणारा हा कवी रामकथेतील शबरी अध्यायात रमून गेलेला दिसला.

तुमचे रेगे वेगळं लिहितात. आवडतात. कुसुमाग्रजही मोठे कवी. पाडगांवकर अधिक आवडतात. जणू ते मला मोकळं वाटावं म्हणून बोलू लागले. मी पुष्कळ कवितांचा अनुवाद केला आहे. ते मला आवडतं. कुतूहल वाटतं की, इतक्या भाषा बोलणाऱ्याचं जग मात्र एकच असतं. मग ते बघतात काय, कसं? आणि त्याहूनही ते सांगतात काय आणि कसं? हे न्याहाळत जाणं मला आनंदाचं वाटतं.

गुजरातीतील हा श्रेष्ठ कवी कविता, निर्मिती प्रक्रिया, अनुभवांचं एका भाषेतून दुसऱ्या भाषेतील प्रकटन अशा विषयांवर संक्षेपात, पण अत्यंत मोकळेपणाने केवळ माझ्यासाठी बोलत होता ह्याचा आनंद मी हळूहळू जिरवत होतो.

गुजरात-महाराष्ट्राचे स्नेहबंध सांगताना ते म्हणाले, 'आचार्य काका कालेलकर गुजरातचे झाले आणि मी मुंबईचा. काकाजींनी गुजरातीमध्ये विपुल लेखन केलं आणि मी मुंबईवर, मुंबईकर म्हणून, मुंबईवरच्या आत्यंतिक प्रेमापोटीच.' कालेलकरांच्या अनुषंगाने रवींद्रनाथांचा उल्लेख झाला. त्यांनीच गुजरातला गुरुदेवांची 'भारतीय ऋषीपरंपरेतील प्रतिभावान साहित्यिक' अशी ओळख करून दिली. मीही काकांच्या 'रवींद्र मनन, रवींद्र झंकार, नैवेद्य' अशा साहित्याचे कृतज्ञ स्मरण व्यक्त केलं.

आंतरभारतीय प्रतिभेच्या ताण्याबाण्यांविषयी बोलणं सुरू होतं म्हणून मी स्वा. सावरकरांच्या 'रवींद्रनाथांचे अभिनंदन' ह्या कवितेची माहिती सांगितली. १९१३ मध्ये 'रवी'प्रतिभेला नोबेल पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं तेव्हा कविप्रतिभेचा दुसरा धनी अंदमानात कोलू ओढत होता, काथ्या कुटत होता ! पण ती आनंदवार्ता कानी येताच त्याने अभिनंदनपर कविता केली...

हा आज घुमे जय कैचा
भारवी कालिदासांच्या
धरि अघृत मान मुकुटाचा । का रवी ॥
याचा आनंद व्यक्त करून,
अलकांत खोवुनी एका
करिं अन्य गुलाबी कलिका
ये यज्ञपूजना देखा । भारती ॥

असे एक पुष्प मस्तकी, तर दुसरे चरणी समर्पित होत देवी भारतीची महापूजाच संपन्न होत असल्याचे सार्थकतेने सांगितलं. ती कविता गुरुदेवांना पाठवलीही. ती त्यांना पोहोचली का? पहायला/वाचायला मिळाली का? त्यांची प्रतिक्रिया काय होती? हे सारेच कुणीतरी शोधायला हवं. जेव्हा जेव्हा ही कविता आठवते तेव्हा तेव्हा मनापासून असं वाटत राहतं. असो.

दलालांना स्वा. सावरकरांच्या कवितेचा आशय अतिशय भावला. ते म्हणाले, 'मी केशवसुत ते पाडगांवकर असा मराठी कवितेचा प्रयत्नपूर्वक प्रवास पाहिला.. आस्वाद घेतला; पण हे महत्त्वाचं स्थानक हुकलंच... चुकलंच.'

त्यांच्या या मनमोकळ्या कबुलीचं मला विशेष वाटलं. असं व्यक्त होणं कठीण असतं, विशेषतः अशा मोठ्या कर्तृत्ववान, प्रतिभावंताला तर अवघडच. त्यांना पुन्हा एकवार वाकून नमस्कार करावासा वाटला.

ती वेळही आलीच होती. जवळपास तासभर कवी-सानिध्य भोगत होतो. तेही भिन्नभाषी. त्यांची कविता मी मुळातून वाचली नव्हती. त्यामुळे तो विषय आपापत:च गळून पडला. पण तरीही त्यांच्या बहुआयामी प्रतिभेमुळे आणि एकूणच कवितेवरील अपार प्रेमामुळे भेटीवर मौनाची छाया पडली नाही. ते बोलत राहिले, संवाद-वाट उजळत राहिली.

निघताना पुन्हा नमस्कार केल्यावर त्यांनी हातात प्रसाद म्हणून त्यांचा साहित्य अकादमी पुरस्कार

---

मिळालेला 'अखंड झालर वागे' हा संग्रह ठेवला. माझ्या गुजराती वाचनाची सुरुवात बहुधा तिथूनच होणार होती. माझ्या वडिलांना गुजराती बोलता-वाचता येई, पण घरी गुजराती पुस्तकं मात्र नव्हती.

एका साहित्य अकादमीने सन्मानित केलेल्या प्रतिभावंताची भेट घेण्यासाठी येताना एक सूक्ष्म आशंका मनात ठुसठुसत होती. त्या वर्षी अरुंधती रॉय या अवास्तव गाजावाजा झालेल्या आणि अजिबात औचित्य नसलेल्या लेखिकेलाही साहित्य अकादमी पुरस्कार घोषित झाला होता. आणि त्यांनी तो नाकारला होता. कदाचित तीच 'पुरस्कार वापसी'च्या रोगाची पहिली साथ असावी. तसेच काही दलालांच्या मनातही असेल तर !..

पण आता परतताना त्या 'उर्मट नकाराची' सल कधीच विरून गेली होती. आणि कविता-लोभाचा हवाहवासा वाटणारा सुगंध सोबत होता.

सुरेश दलालांनी कवितेत अनेक प्रयोग केले. त्यातील दोन विशेष.. मायाप्रवेश आणि पदध्वनी! एखादं चित्र समोर ठेवून त्यावर रचना करण्याच्या प्रयोगाला त्यांनी 'मायाप्रवेश' असं नाव दिलं होतं. आणि एखाद्या मध्ययुगीन वा पूर्वसुरी कविश्रेष्ठाच्या रचनेची पहिली पंक्ती जणू तोरणासारखी घेऊन त्यापुढे नवं शब्दधाम उभं करायचं या प्रयोगाचं त्यांनी 'पदध्वनी' असं मोठं अन्वर्थक नामकरण केलं होतं. मला मिळालेला प्रसादही या पदध्वनीचाच निनाद होता. शीर्षकस्थ 'अखंड झालर वागे' ही कविता 'संत उगाराम' या गेल्या शतकातील आधुनिक संतकवीच्या रचनेच्या प्रथम पंक्तीवरून लिहिलेली रचना होती. तो पदध्वनी आजवर सोबत करतोच आहे.

१० ऑगस्टला सुरेश दलाल यांच्या अकराव्या स्मृतिदिनी हे सारं आठवलं. त्यांची एक निराशा झटकून टाकणारीच नव्हे; तर त्यातूनच नव्या उन्मेषाची आनंदाने वाट पाहण्याचं बळ देणारी कविता खूप आवडली होती. तीच पुन्हा वाचताना त्या शब्दांचा जणू अनुनाद मनात गुंजत गेला. त्या कवितेचा भावानुवाद आकाराला आला. खूप दिवसांनी कवितेचा अनुवाद लिहून झाला.

मूळ कवितेचं शीर्षक : **सपनां वसंतना**

स्वप्न वसंताचे...

पानगळीचा ऐन ऋतू.. तरू
वसंत-स्वप्नामध्ये दंग ।
डहाळ्यांवरी घोस फुलांचे
गंधाने दरवळते अंग ॥

आज जरी विद्रुप.. वठलेला
आहे..असू द्या! उद्या नव्याने ।
शुष्क तनुतून येईल दौडत
स्पंदन हिरवे चैतन्याने ॥

शिशिरशरण हतपर्ण जरी मी
क्लेश नसे वा शल्य न खुपते ।
येईल नूतन ऋतू पुनरपी
गाईल कोकिळ पंचमगीते ॥

कुणी जपावी ओलपापणी
तशी कुठुनशी झुळूक येतसे ।
माया? किमया? ठाऊक नाही
कानाशी मग कोण गातसे? ॥

अवचित एके दिनी मनाच्या
मुग्ध मुळाशी बिलोर ऐना ।
चमकावा जणू तसा घमघमे
अनंततेचा स्वप्नतराणा! ॥

कवितालोभी प्रतिभावंत सुरेश दलाल यांना विनम्र वंदन !!

**– प्रमोद वसंत बापट**
०१, प्राजक्त, बी – ४, अशोकवन,
बोरिवली पूर्व, मुंबई : ४०००६६
भ्रमणध्वनी : ९८२१९७९८७१

●●●

# पुराचिन्हांचे 'भीम'संशोधक : डॉक्टर हरिभाऊ वाकणकर

*मानववंशाचा हजारो लाखो वर्षांचा प्राचीन इतिहास, अश्मयुगापासून घडत आलेली त्याची वाटचाल हा नेहमीच सामान्यजनांच्या कुतूहलाचा व शास्त्रज्ञांच्या संशोधनाचा विषय राहिला आहे. भारतातही मानवाच्या प्राचीन इतिहासाच्या खुणा अनेक ठिकाणी सापडल्या आहेत. प्रमुख भारतीय पुरातत्त्व संशोधकांच्यात ज्यांचं नाव अतिशय आदरानं जगभर घेतलं जातं असे डॉक्टर हरिभाऊ तथा विष्णू श्रीधर वाकणकर यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्तानं त्यांनी केलेल्या प्रचंड कार्याचा हा आढावा. – संपादक*

हरिभाऊंचा जन्म मध्यप्रदेशातील मंदसौर जिल्ह्यातील निमच या गावात, चार मे एकोणीसशे एकोणीस सालचा.



वाकणकर परिवाराचा आठ पिढ्यांचा इतिहास उज्जैनमधे उपलब्ध आहे. आर्थिक स्थिती फारशी मजबूत नसली तरी समाज व राष्ट्राप्रती प्रेम या घराण्यात फार आधीपासून आहे. हरिभाऊंना असलेल्या चित्रकला व इतिहास या विषयांच्या विशेष आवडींमुळे त्यांनी शालेय शिक्षणानंतर प्रथम मुंबईला जीडी आर्टस व नंतर उज्जैनला विक्रमशिला विद्यापीठात शिक्षण घेतलं. उच्च शिक्षणानंतरही योग्य नोकरी न मिळाल्यामुळं उज्जैनमधेच त्यांनी काही काळ एक आर्ट सेंटर चालवलं. मग काही काळ मुंबईला एका म्युझियममधे नोकरी केली. परत उज्जैनलाच ते विक्रमशीला कॉलेजात प्राध्यापक म्हणून रुजू झाले.

त्यांना मुळात असलेली इतिहास व पुरातत्त्व शाखांची आवड त्यांना खुणावत होती. कालिदासाने मेघदूताची रचना ज्या ठिकाणी केली त्या रामगढ या ठिकाणाचा (रामगिरी पर्वत) संशोधनपर अभ्यास व्हावा या हेतूने हरिभाऊंनी तिथे जाऊन त्या परिसराचा अभ्यास सुरू केला. तिथे त्यांना आश्चर्यकारक खुणा सापडल्या.

रामगिरी पर्वतावर त्यांना स्वच्छ पाण्याचे सरोवर आढळले. हरिभाऊंनी तो सारा परिसर व डोंगर पालथा घातला. रामगिरीच्या पायथ्याशी त्यांना एक गुहा आढळली त्याच्या डाव्या बाजूवर 'मेघदूत' असे खोदलेले आढळले. उजवीकडे 'सुतनुका' असं लिहिलं होतं. तसंच आतवर चढत गेल्यावर एका जागी 'कालिदासम्' अशी अक्षरं खोदलेली सापडली. या साऱ्यांवरून त्यांनी कयास केला की, याच ठिकाणी मेघदूत लिहिलं गेलं असावं.

कालंतरानं अधिक संशोधनानंतर कालिदासानं वर्णन केलेली भौगोलिक स्थिती, हवामान, मार्ग या साऱ्यांचा अभ्यास होऊन 'हेच ते स्थान' यावर संशोधकांनी शिक्कामोर्तब केलं.

उज्जैनजवळ दंतेवाडा गावात सुरू असलेल्या उत्खननात देखील त्यांनी प्रचंड परिश्रम घेतले. त्या दरम्यान त्यांचे मध्यप्रदेशात सतत प्रवास सुरू असत. १९५८ साली भोपाळ ते इटारसी प्रवासात बाहेर दिसणाऱ्या डोंगरांचं निरीक्षण करताना त्यांना काही गुहासदृश्य पोकळ्या दिसून आल्या. सहप्रवाशांना विचारलं असता त्या जागेला 'भीमबैठका' (भीम बसत असे ती जागा) म्हणतात अशी माहिती मिळाली.

हरिभाऊंची उत्सुकता त्यांना स्वस्थ बसू देईना. तिथे जाण्यासाठी कोणताच अन्य मार्ग नाही व वन्य प्राण्यांच्या भीतीनं आजवर तिथं कुणीही गेलेलं नाही अशी माहिती मिळाल्यावर त्यांनी तिथेच उतरायचा निर्णय घेतला. पुढील स्थानकाकरता गाडीचा वेग मंदावताच त्यांनी गाडीतून उडी मारली व ते त्या डोंगरांच्या दिशेनं निघाले. खूप पायपीट केल्यानंतर त्या पोकळ्यांपर्यंत ते पोहोचू शकले.

भोपाळच्या दक्षिणेला रायसेन जिल्ह्यातील भीमबेटका हे अज्ञात ठिकाण मानववंशाच्या इतिहासाच्या किती महत्त्वाच्या खुणा सांभाळतं आहे हे तोवर कुणालाच ज्ञात नव्हतं. हरिभाऊ तिथे गेले तेव्हा त्यांना लक्षात आले की, या पोकळ्या म्हणजे प्राचीन गुहा आहेत. कोणत्याही सोयी-सुविधा नसण्याच्या काळातही ते सलग पंधरा वर्षं तिथं जात राहिले. अभ्यास-संशोधन करत राहिले. त्यावेळी त्या जंगलात भोजनाची काही व्यवस्था होणं शक्यच नव्हतं. हरिभाऊ सोबत बटाटे घेऊन जात. ते तिथे पोचताच वाळूत पुरून ठेवत व काम करत रहात.

काही वेळानंतर ते वाळूतल्या उष्णतेमुळं आपोआप भाजले जात. त्यावर त्यांची गुजराण होई. त्या परिसराचा इतिहास उजेडात आणण्याकरता त्यांनी अतिशय खडतर परिश्रम घेतले. त्या गुहांमधे त्यांना भिंतींवर, छतांवर रंगवलेली प्राचीन चित्रं आढळली.

वनस्पतीजन्य वा खनिज रंगात रंगवलेल्या चित्रांचा अक्षरशः खजिनाच त्या गुहांमधे त्यांना सापडला. विंध्य पर्वताच्या कुशीत, घनदाट जंगलातील सात डोंगरांमधे विखुरलेल्या साडे-सातशे गुहांमधल्या पाचशेच्या वर गुहांमधे चित्रं होती. चित्रं प्रामुख्यानं लाल व पांढऱ्या रंगात रंगवलेली होती. काही काही ठिकाणी हिरव्या व लाल रंगांचे ठिपके होते. चित्रांत शिकारीचे प्रसंग होते. त्यात भाला, काठी अशी अवजारं आणि वाघ, हरीण, घोडे, हत्ती असे प्राणीही चित्रित केलेले होते. काही धार्मिक म्हणावीत अशी चिन्हं, समूह-नृत्यं व अन्य काही व्यवहारदेखील चित्रांत दिसत होते. मानव विकासाचा जणू आरंभबिंदूच या शैलाश्रयांमधे नांदत होता ! त्याचं पुरातत्त्वीय महत्त्व लक्षात घेऊन त्यांनी ती प्रकाशात आणण्याचं ठरवलं. हरिभाऊ स्वतः अतिशय उत्तम चित्रकार होते. त्यांनी चित्रकलेच्या काही विद्यार्थ्यांना सोबत घेऊन त्या गुहाचित्रांच्या प्रतिकृती बनवल्या. परंतु याचं रीतसर संशोधन होणं गरजेचं आहे हे ध्यानात घेऊन त्यांनी त्यांचे मार्गदर्शक प्राध्यापक प्रा. सांकलिया (ज्यांनी रामायणाची काळनिश्चिती केली) त्यांच्या मार्गदर्शनाखाली या गुहाचित्रांवर पीएचडी पूर्ण केली. भारतीय पुरातत्त्व खात्याने ऑगस्ट १९९० मधे भीमबेटका राष्ट्रीय वारसा स्थळ घोषित केलं. कार्बन डेटिंग पद्धतीनं या गुहांचा व चित्रांचा काळ शोधला असता, ते शैलाश्रय अश्मयुगीन असल्याचं लक्षात आलं. त्या परिसरात आजूबाजूच्या २१ खेड्यांमधे अनेक अवशेष विखुरले आहेत. त्यात काही किल्ल्यांच्या भिंती, लघुस्तूप, पाषाण भवने, गुप्त कालीन अभिलेख, परमारकालीन मंदिरांचे अवशेष असा पाषाणयुगापासून ते ज्ञात ऐतिहासिक काळापर्यंतचा मानव-इतिहासाचा मोठा आलेख सापडला.

फ्रान्समधे भरलेल्या पुरातत्त्व शास्त्रज्ञांच्या एका परिषदेत त्यांनी सर्वप्रथम आपलं संशोधन व त्या चित्रांच्या प्रतिकृती सादर केल्या होत्या. युरोप अमेरिकेतही अनेक ठिकाणी या चित्रांची प्रदर्शने व त्याला जोडून व्याख्याने असे अनेक कार्यक्रम हरिभाऊंनी केले. रीतसर संशोधन प्रक्रियेनंतर युनेस्कोने त्यांच्या संशोधनाला मान्यता दिली व भारतातील भीमबेटका हे जागतिक वारसा स्थळ म्हणून घोषित केलं.

चंबळ व नर्मदा खोऱ्याचं सर्वेक्षण, नावडातिली (१९५५) महेश्वर (१९५४) इंग्लंड (१९५९) पनोटी आवरा (१९६०) कायथा मंदसोर दांगवाडा इ. पुरातत्त्वीय

संशोधनांमधेही हरिभाऊंचा मोठा वाटा होता. इंग्लंड व फ्रान्समधील उत्खनन कामांतही त्यांनी भाग घेतला.

जवळजवळ ५० वर्षं जंगलात पायी हिंडून त्यांनी हजारो चित्रगुंफा शोधल्या. त्यांच्या चित्रप्रतिकृती बनवून त्याची देश-विदेशात प्रदर्शनं भरवली, व्याख्यानं दिली, लेख लिहिले. एकूण २५० हून अधिक संशोधन-निबंध त्यांच्या नावावर जमा आहेत. त्यांनी अनेक पुस्तकं लिहिली.

पैकी Rockart of Bhimbetka हे पुस्तक त्यांनी ऑस्ट्रेलियन अभ्यासक Lothar Wanke यांच्या सहकार्यानं लिहिलं.

अजून एक रोचक सत्य उजेडात येण्यासाठी हरिभाऊ कारणीभूत ठरले. ते एकदा लंडनमधील म्युझियम पहात होते. तिथे त्यांना राजा भोज याच्या दरबारात असलेली सरस्वतीची मूर्ती दिसली. हरिभाऊ त्या मूर्तीचं बारकाईनं निरीक्षण करण्यात गुंतले. त्यांच्या लक्षात आलं की, मुस्लीम आक्रमणात क्षतिग्रस्त झालेली हीच ती मूर्ती.

त्याच ठिकाणचे रहिवासी असलेले हरिभाऊ सारा इतिहास आठवून भावुक झाले. दुसरे दिवशी ते पुन्हा एक फूल घेऊन गेले. ते वाहून नमस्कार करताना पाहून तिथल्या प्रमुखानं त्यांची चौकशी केली. हरिभाऊंची ओळख पटताच त्यानं स्वतःहून त्यांना एका खास दालनात नेलं. तिथं फक्त संशोधकांना प्रवेश होता. त्या खोलीत खूप डायऱ्या होत्या. भारताला भेट दिलेल्या प्रवाशांच्या या नोंदी आहेत असं त्यानं सांगितलं.

हरिभाऊंना त्यात चक्क वास्को दि गामाची डायरी मिळाली. त्यात त्यानं, 'भारताचा शोध घ्यावा असं का वाटलं, तिथं जाण्यात कुणी मदत केली, कसा मार्ग शोधला?' वगैरे बाबी नोंदल्या होत्या. त्या नोंदींवरून असा शोध लागला की, वास्को दि गामाला एक खुद्द भारतीय व्यापारीच भेटला, जो स्वतःचे जहाज घेऊन नियमित व्यापार करत असे. त्यानेच गामाला मार्ग दाखवला.

आर्य-द्रविड आक्रमण सिद्धांतही खोटा व दूषित असल्याचं हरिभाऊंनी ग्रंथ लिहून सप्रमाण सिद्ध केलं.

सरस्वती नदीचं स्थान भारतीय संस्कृतीत मोलाचं आहे. ऋग्वेदांतील ऋचांमधे देखील 'अंबीतमे, नदीतमे, देवीतमे सरस्वती, अन्नवती, उदकवती' असे तिचे उल्लेख आहेत.

सरस्वती व तिचं लुप्त होणं हे मिथक नसून, ऐतिहासिक व भौगोलिक सत्य आहे हे सिद्ध करण्याकरता अनेक देशी-विदेशी संशोधकांनी काही काम केलं होतं. या सर्वांचा आधार घेत हे काम पुढं न्यावं याकरता श्री. मोरोपंत पिंगळे यांच्या सूचनेनुसार १० फेब्रुवारी १९८३ रोजी कुरुक्षेत्र येथे एक सेमिनार आयोजित केला गेला. त्यात 'सरस्वती नदी अध्ययन केंद्रा' ची स्थापना झाली. या समितीचे संयोजक म्हणून हरिभाऊंची नियुक्ती झाली. हरिभाऊंच्या 'सरस्वती नदी शोध-अभियान' या संशोधन प्रकल्पातून सरस्वतीचा प्रवाह, तिच्या काठची संस्कृती, याचा शोध घेणं सुरू झालं. या प्रकल्पाचं महत्त्व लक्षात घेऊन सरस्वती नदीचा मार्ग शोधण्याकरता इस्रोनं सहाय्य केलं. आदिबिद्री या सध्या पाकिस्तानात असलेल्या सिंध प्रांतापासून, कच्छ व गुजरातच्या रणांमधून असा जवळजवळ चारहजार किलोमीटरचा प्रदेश हरिभाऊंच्या चमूनं पालथा घातला. पुरातत्त्व शास्त्रज्ञ, भूवैज्ञानिक, हिमालय अभ्यासक, तज्ज्ञ छायाचित्रकार, लोककला अभ्यासक यांचा समावेश या चमूत होता. या यात्रेत त्यांनी अनेक अवशेष एकत्र केले व उज्जैन विद्यापीठासमोर ठेवले. तिथून सरस्वती नदीवरील संशोधन प्रकल्पांना अधिक गती मिळाली.

हरिभाऊंच्या संपूर्ण आयुष्यात या संशोधन कार्यासोबतच सामाजिक कार्यातील सक्रिय सहभागाचा प्रवाहदेखील तितक्याच ठळकपणे वहात होता. तरुण

वयात स्वातंत्र्य सैनिक असलेल्या हरिभाऊंनी नंतर रा.स्व. संघाचे प्रचारक म्हणून व काही काळ अ. भा. विद्यार्थी परिषदेचे मध्यप्रदेश प्रांताचे अध्यक्ष म्हणून काम केले. १९६६ साली प्रयाग येथे झालेल्या विश्व हिंदू संमेलनाकरता श्री. एकनाथजी रानडे यांच्या विनंतीनुसार प्रदर्शनी विभाग सांभाळण्याकरता ते गेले. त्यांची कलासक्त वृत्ती व सौंदर्यदृष्टी याचा पुरेपूर वापर त्यांनी संमेलनात केला. त्यानंतर अशा मोठ्या संमेलनांत त्यांची ती जबाबदारीच होऊन गेली. त्यानंतर त्यांनी भारतीय संस्कृती, कला व इतिहास या विषयावर व्याख्याने देत देश-विदेशात भरपूर प्रवास केला. १९८१ साली 'सा कला या विमुक्तये' अर्थात 'कला तीच, जी बंधमुक्त करते' या विचाराने ललितकलाक्षेत्रात काम करणारी 'संस्कार भारती' ही संघटना सुरू झाली. तिचे संस्थापक महामंत्री म्हणूनही हरिभाऊंनी काम पाहिले. काही काळ ते संघाचे प्रांत बौद्धिक प्रमुखही होते. संघाशी असलेली आपली बांधिलकी त्यांनी कधीच नाकारली वा लपवली नाही.

त्यांच्या पीएचडीवेळी समितीतील एका सदस्याने त्यांना सांगितले, 'तुमच्या प्रबंधातील संघाचा उल्लेख तेवढा काढून टाका'. त्यावर ते उत्तरले, 'तुम्ही मला पीएचडी दिली नाहीत तरी हरकत नाही. पण माझ्या संपूर्ण संशोधनात मला साह्यभूत झालेल्या माझ्या संघ-बंधूंचे ऋण मी कसं नाकारू ?'

एका मुलाखतीत त्यांनी आपले संशोधनातले असे काही अनुभव सांगितले आहेत. ते म्हणत की, 'पुरातत्त्वशास्त्राच्या दृष्टीनं भारतात उत्खननात सापडलेल्या वस्तू या इंग्लंड वा फ्रान्समधे मिळालेल्या वस्तूंपेक्षा कितीतरी मौल्यवान आहेत. परंतु आपल्या देशात सरकार वा सामान्य माणसाला या संशोधनाचं महत्त्व कळत नाही. आजूबाजूचे रहिवासी अशा ठिकाणांचं नीट जतन करत नाहीत.' भीमबेटका जगप्रसिद्ध झाल्यानंतरही सरकारला त्याची फारशी जाण नव्हती. एकदा एक जपानी संशोधकांचा चमू भीमबेटका शोधत भारतात आला. आल्या आल्या त्यांनी सरकारी खात्यात चौकशी केल्यावर 'अशी काही जागा इथं नाही' असं त्यांना उत्तर मिळालं होतं ! सरकार हरिभाऊंना संशोधनाकरता आर्थिक सहाय्य करत होतं वर्षाला अवघे दहा हजार ! त्याचवेळी अमेरिकेतून आलेल्या एका विद्यार्थिनीला प्रवास खर्चा व्यतिरिक्त दीड लाख रुपये अनुदान मिळत होतं ! हरिभाऊ गमतीनं म्हणत, 'मी तहान-भूक विसरून उपाशीपोटी संशोधन करावं अशी सरकारची अपेक्षा आहे !' ते असल्या अडचणींनी कधीच थांबले नाहीत. संशोधनाची अनिवार ऊर्मी व गरजा कमीतकमी ठेवून काम करण्याची वृत्ती यामुळं त्यांच्या हातून इतकं पर्वतप्राय काम उभं राहिलं.

संघपरिवाराव्यतिरिक्त त्यांच्या अभ्यासविषयाशी संबंधित अनेक संस्थांवर त्यांनी काम केलं. 'भारत कला भवन, ललित कला संस्था, शैलाश्रय कला संस्था, विक्रम विद्यापीठ उज्जैनच्या उत्खनन विभागाचे संचालक, इतिहास संकलन समिती मध्यप्रदेश व गुजराथची जबाबदारी' अशा अनेक मार्गांनी त्याचं काम अव्याहत सुरू होतं. त्यांना संशोधनाकरता दोराबजी टाटा ट्रस्टचं अनुदान मिळालं होतं. १९६१ ते ६३ या काळात फ्रान्स सरकारची शिष्यवृत्ती देखील त्यांना मिळाली होती.

हरिभाऊंची रहाणी अत्यंत साधी होती. पॅरिसमधील मुक्कामात ते स्वत: स्वयंपाक करून जेवत. त्यांच्या मौलिक संशोधनाबद्दल १९७५ साली त्यांना भारत सरकारनं पद्मश्री देऊन गौरवलं. कदाचित आपणच दिलेल्या पद्मश्रीची आठवण झाल्यामुळं असेल, पण 'आणीबाणीत मला सरकारनं मुळीच हात लावला नाही' असं ते गमतीनं म्हणत. अर्थात तत्कालीन पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांना हरिभाऊंच्या कार्याबद्दल आदर होता. हरिभाऊ त्यांच्याशी थेट संपर्क करू शकत होते.

(पृष्ठ क्र. १५ वर)

# कायदेशीर सल्ला केंद्रामधील अनुभव : कौटुंबिक संस्था अडचणीत असल्याचा भास

*लग्न ठरविताना ज्या अत्यंत महत्त्वाच्या मुद्यांची चर्चा करून, त्या मुद्यांविषयी कोणतेही प्रश्न निर्माण होणार नाहीत याबाबत पूर्णपणे दुर्लक्ष केले जाते. चर्चा होते ती फक्त समारंभ कसा, किती लाखांचा करायचा याबाबत ! याला नवरदेवाच्या बाजूसहित वधूची बाजूदेखील तेवढीच जबाबदार, कारणीभूत असते. याबाबत - संपादक*

विद्या प्रसारक मंडळाच्या टीएमसी विधी महाविद्यालय अनेक वर्षांपासून मोफत 'विधी सल्ला केंद्र' चालवीत आहे. हे केंद्र प्रत्येक शुक्रवारी आणि शनिवारी सायंकाळी ४ ते ६ या वेळेदरम्यान सर्व गरीब व गरजू लोकांसाठी खुले असते. या केंद्राचा प्रभारी म्हणून सल्ला देण्याचे काम व या केंद्राद्वारे करण्यात येणाऱ्या सगळ्या कार्यक्रमाची जबाबदारी माझ्याकडे देण्यात आली आहे. अशावेळी अनेक प्रकारची लोकं सल्ला घेण्यासाठी आमच्या महाविद्यालयात येतात. प्रत्येक व्यक्ती गरीब आणि गरजू असतेच असे नाही, परंतु तरी देखील आम्ही त्याला सल्ला द्यायचे काम करतो. आमच्या महाविद्यालयाचे 'विधी सल्ला केंद्र' हे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, ठाणे यांच्या सोबत ही अनेक कामांमध्ये सहभागी असते. खरंतर आम्हांला एका नोंदवहीमध्ये अशा लोकांच्या नोंदी करणे आवश्यक असते. पण आमचा अनुभव असा आहे की, जवळपास प्रत्येक व्यक्ती अशी नोंद करण्यास नकार देतात, त्यांना जबरदस्ती करता येत नाही आणि खरे तर सहमती शिवाय नोंद करणे नैतिकदृष्ट्या योग्य नाही. आमच्याकडे येणाऱ्या १० प्रकारणांपैकी ७ ते ८ प्रकरणे हे कौटुंबिक कलहाशी किंवा वादाशी संबधित असतात. त्यांच्या समस्या ऐकताना अनेकदा असे जाणवते की, अगदी लहान लहान बाबींवर टोकाचा निर्णय घेण्याची लोकांची तयारी असते, अनेक मुद्दे जे एकेकाळी वादाचा सोडाच पण चर्चेचा देखील विषय नव्हते असे मुद्दे कौटुंबिक वादाची कारणे बनत चालले आहेत. या लेखाच्या माध्यमातून असेच काही अनुभव वाचकांसाठी सांगत आहे, ह्या अपेक्षेने कि कुटुंब संस्था ही समजुतदारीने टिकवण्याची बाब असते याची जाण आपल्या सगळ्यांना व्हावी. अशाच काही प्रकरणांचा इथे उल्लेख करणार आहे ज्यामध्ये मी दिलेल्या सल्ल्याची पार 'ऐसी तैसी' झाली आहे. हे सांगताना मला हेही नमूद केले पाहिजे की, अनेक महिलांना त्यांच्या पती आणि सासरच्या लोकांकडून अनेक प्रकारचा त्रास होत असतो, अशा प्रकरणामध्ये आम्ही कायद्यानुसार जे काही करणे योग्य आहे तसा सल्ला देत असतो. खालील प्रकरणे अशी आहेत ज्यावर रडावे की मोठ्याने हसावे तेच कळत नाही !

**मला कायदा कळत नाही.**

६०-६५ वर्षीय एका मध्यवर्गीय व्यक्तीला त्याच्या विवाहित मुलीच्या कौटुंबिक वादासंबंधी सल्ला हवा होता. मुलीला होणार त्रास दोन प्रकारचा होता. पहिला,- लग्नानंतर मुलाच्या आई-वडिलाने व लहान भावाने एकाच घरात राहणे आणि सासूचे सकाळी सकाळी उठून सुनेसाठी व स्वतःच्या मुलासाठी डब्बा तयार न करून देणे. मुलीची इच्छा अशी होती की, सासू-सासरे आणि दीर या तिघांनी कुठेतरी दुसरीकडे राहण्यास गेले पाहिजे. नवरा या मागणीस सहमत नसल्याने, तसेच सासू डब्बा करून देत नसल्याने लग्नाच्या पाचव्या महिन्यात मुलगी वडिलांकडे आली व मागील ५-६ महिन्यांपासून वडिलांकडे राहत आहे. यावर सल्ला द्यायचा होता. मुलीला काही मारहाण, शिवीगाळ, आर्थिक त्रास, पैशांची मागणी किंवा नोकरी करण्यास विरोध असा काही त्रास आहे का? उत्तर नकारात्मक होते. या दोन मुद्यांवर काय केस करता येईल यावर त्यांना मार्गदर्शन हवे होते. सासू-सासरे व दीर दुसरीकडे राहायला जात

नाही हा काही कायदेशीर गुन्हा नाही. त्यामुळे या मुद्यावर कोणतीच केस होऊ शकत नाही, आणि राहिला मुद्दा सकाळी डब्बा करून द्यायचा तर, तुमच्या मुलीला सांगा की, सकाळी लवकर उठून स्वतःचा व नवऱ्याचा डब्बा तयार करावा, जमले तर सगळ्यांसाठी स्वयंपाक करावा, दोघेही कमवतात तर संध्याकाळ साठी एखादी बाई ठेवा स्वयंपाकाला. बाकी तुमचे मुद्दे कायद्याचा कक्षेत बसत नाहीत आणि म्हणून 'वाद वाढवण्यापेक्षा समजुतीने एकत्र रहा' हा माझा सल्ला त्या गृहस्थाच्या पचनी पडला नाही. त्यांच्या मते त्यांच्या मुलीला या कारणासाठी जो मानसिक त्रास होत आहे त्यासाठी सासू-सासरे आणि दीर याना कैद होऊ शकते, आणि मी तर 'काहीच होऊ शकत नाही' असे सांगत आहे. 'साहेब, वाईट वाटून घेऊ नका, पण तुम्हाला कायदा कळत नाही असेच मला वाटते', असा मोलाचा सल्ला त्या गृहस्थानी मला दिला! जे आई-वडील, स्वतःच्या मुलाच्या लग्नानंतर नवीन सुनेला एकांत देऊ शकत नाहीत, तिच्यासाठी डब्बा करू शकत नाहीत, असे वाईट लोक या जगात आहे, यावर विश्वास ठेवणे कठीण असल्याचे त्यांनी सांगितले. खरंतर ज्या पोटतिडकीने ते गृहस्थ बोलत होते दोन गोष्टी, काही काळ का होईना पण मला पटल्या होत्या. पहिली,- त्यांच्या मुलीला जो मानसिक त्रास होत आहे, तो सहन करण्यापलीकडचा आहे आणि दुसरे,- मला कायदा पुन्हा एकदा वाचायची गरज आहे !

**जिसपे बीतती है उसेही समजती है ।**

ठाणे स्थित एक उत्तर भारतीय रिक्षावाला त्याच्या दोन मुलींना घेऊन सल्ला घेण्यासाठी आला. ठाण्यातील एका झोपडपट्टीमध्ये राहणारे हे गृहस्थ एक वेगळीच समस्या घेऊन आले होते. त्यांची ती २४-२५ वर्षीय विवाहित सुंदर मुलगी हिला जगावेगळा त्रास होत होता. बाजूला २१-२२ वर्षीय बहीणही बसली होती. 'साहब, हमारे दामाद और उनका परिवार खुद होकर हमारे घर आये थे, वेही हमारे बेटीसे शादी करने की जिद कर रहे थे।' यांचे जावई कल्याणमध्ये राहतात, त्यांचे स्वतःचे घर आहे, दुकान आहे, काही घरे भाड्यांनी दिली आहेत. उपर मकान, नीचे दुकान है। छोटा भाऊ बाहेर नोकरी करतो, दुकान ह्या मुलीचा नवरा सांभाळतो. घरामध्ये काम करण्यासाठी कामवाली बाई आहे. पण भांडणाचा मूळ मुद्दा असा आहे की, संध्याकाळी जेव्हा ह्या मुलीचा नवरा दुकान बंद करून घरी येतो तेव्हा, पहिल्यांदा आईशी बोलतो आणि सगळी रोख रक्कम आईच्या हाती देतो 'साहब शादी होकार ६ महिना हो गया। क्या इसके पती को सारे पैसे बीबी के हातमे नही देना चाहिये? मेरे बेटी ने कितना समझाया पर दामाद मानते ही नही, इसलिये मेरी बेटी वापस आ गाई, और मेरे पास है पिछले ६ महिनेसे'. 'याच्या व्यतिरिक्त काही त्रास आहे का?' 'नही, बस इतनी सी बात है, जो दामाद और उसकी माँ नही समझ रहे। मेरी बेटी बिचारी खुद को कोस रही है क्यो इस आदमी से शादी की?' म्हणजे असाही मानसिक त्रास होऊ शकतो याचे आश्चर्य व्यक्त करीत मी असा सल्ला दिला की, यामध्ये काहीही गैर दिसत नाही. तुमच्या मुलीला जे हवे ते मिळते, कोणताच शारीरिक, आर्थिक आणि तुम्ही सांगितलेला मानसिक त्रास सोडून इतर कुठलाही मानसिक त्रास नाही, अशा वेळी तुम्ही काय तक्रार करणार? या कारणावरून ना कोर्टात काही केस करता येईल ना पोलिस काही कारवाई करतील. उलट तुम्ही तुमच्या मुलीस समजावून सांगा आणि वाद अजून वाढविण्यापेक्षा सुखाने संसार करा आज ना उद्या तुमच्या मुलीच्या हाती सगळा कारभार येईलच की! एवढी घाई कशाला हवी? मुलीच्या डोळ्यांतील अश्रू बघून तो रिक्षावाला गृहस्थ म्हणाला की, वो वकील साहब ने सही बोला था मोफत मे गलत ही सलाह मिळती है। वकील साहब तो नोटीस भंजन को तयार थे, पर हमे लगा एक बार आपकी भी राय ले, पर आपको तो कुछ भी नही आता। मुझपर और मेरी बेटी पर क्या गुजर रही वो आप

नही समझ पाओगे। जिसपे बीतती है उसे ही समजती है। ते सगळे निघून गेल्यानंतर त्या मुलीच्या अश्रूने आणि तिच्या बापाच्या दुःखाने मलाही थोडावेळ असे वाटले की, त्या मुलीच्या नवऱ्यासारखा वाईट माणूस या जगामध्ये दुसरा कुणीच नसेल !

**ठाण्याला फ्लॅट हवाय :**

ठाणे स्थित एक मध्यमवर्गीय कुटुंबातील एका मुलीची समस्या अशी होती की, तिचा नवरा ठाण्याला फ्लॅट घ्यायला तयार नाही. मुलीला तिच्या आईची धन आणि मन अशा दोन्ही प्रकारची साथ होती. लग्नाच्या सहा महिन्यांपर्यंत या बिचाऱ्या मुलीने कल्याणच्या हवेत कसाबसा श्वास घेतला, परंतु सहा महिन्यानंतर तिला कल्याणच्या त्या हवेत श्वास घेणे असह्य झाले आणि म्हणून तिने नवऱ्याला ठाणे इथे फ्लॅट घ्यावा असा आग्रह केला. परंतु नवऱ्याने ह्या पीडित मुलीची एक लहान इच्छा पूर्ण करण्यास नकार दिला म्हणून बिचारी मुलगी माहेरी आईकडे आली. मुलीचा नवरा एका खाजगी कंपनीत कामाला होता आणि पगार मुलीच्या माहितीप्रमाणे तीस हजार होता. मुलीच्या आईचे म्हणणे होते की, त्यांची मुलगी लहानपणापासून ठाण्यात राहिली, इथेच लहानाची मोठी झाली अशा परिस्थितीमध्ये जावईबापूला मुलीची भावना कळली पाहिजे. जेव्हा तिला घेऊन जाण्यास जावई आले होते तेव्हा मुलीच्या आईने मोठे मन दाखवून मधला मार्ग सांगितला की, त्यांनी ठाण्याला भाड्याने राहावे, पण जावई ऐकायलाच तयार नाही. माहेरी येऊन मुलीला जवळपास चार-पाच महिने झाले आहे. अशा परिस्थितीमध्ये नवऱ्याविरोधात काय करता येईल यासाठी या दोन पीडित महिला आल्या होत्या. 'लग्नापूर्वी तुम्हांला मुलाचे घर कुठे आहे हे माहीत नव्हते का?' 'हो माहिती होते पण आम्हांला वाटले की ते येतील ठाण्याला'. पण कल्याण-ठाणे काही जास्त दूर नाही. मग कशाला एवढा आग्रह?' या माझ्या प्रश्नावर मुलीच्या आईचे उत्तर होते की, 'तिथले पाणी हिला मानवत नाही, किती वेळा ती आजारी पडली.' 'मला वाटते तुमचा वाद विशेष असा नाही आणि हा वाद वाढविणे भविष्याच्या दृष्टीने योग्य नाही. हजारो लोक रोज कल्याण-ठाणे प्रवास करतात, त्यामुळे यावर वाद करण्यापेक्षा मुलीने सासरी जावे व सुखाने नांदावे, इतर काही वाद किंवा समस्या असतील तर सांगा पण या मुद्द्यावर पोलिस किंवा न्यायालय तुम्हाला मदत करणार नाही. कारण नवऱ्याने काही चूक केली किंवा काही त्रास दिला असे जाणवत तर नाही. आणि तसेही तीस हजार कमावणाऱ्या व्यक्तीला ठाण्यात फ्लॅट घेणे अवघड आहे.' माझा सल्ला ऐकून जास्त राग आईला आला, त्यांचे म्हणणे होते की, 'माझ्या मुलीचे मन तिथे लागत नाही तर तिने तिथे राहून कशासाठी त्रास सहन करावा. माझ्या मुलीला जो मानसिक त्रास होतो ते फक्त मलाच कळते.' त्यांना अपेक्षित सल्ला न मिळाल्याने त्या दोन पीडित महिला निघून गेल्या! त्या नंतर ही मुलगी जेव्हा ह्या मुद्यावर अश्रू गाळत असेल तर नेमका काय विचार करत असेल, असा विचार मी सुरू केला आणि माझे अश्रू बाहेर येण्यापूर्वी विचार थांबवला!

अशी अनेक उदाहरणे व अनुभव आहेत. पण मुद्दा एवढाच आहे की, विवाह हे फार पवित्र बंधन आहे, हे बंधन अशा लहान लहान कारणांसाठी तोडणे योग्य नाही. आई-वडील म्हणून मुलीच्या आणि मुलाच्या चुकीच्या निर्णयाच्या विरोधात आणि तिच्यावर किंवा त्याच्यावर होणाऱ्या अन्यायाच्या विरोधात देखील उभे राहणे आवश्यक आहे. असे अनुभव जेव्हा आमच्या महाविद्यालयात येतात तेव्हा कौटुंबिक संस्था थोडीशी अडचणीत आल्याचा भास येतो!

**- प्रा. विनोद एच वाघ**
विद्या प्रसारक मंडळाचे टिएमसी विधी महाविद्यालय
ठाणे

●●●

# सर विल्यम जोन्स आणि इंग्लंडमधली 'मनुस्मृती'

*एशियाटीक सोसायटीची स्थापना सर विल्यम जोन्स यांनी केली. शिवाय त्यांनी भारतीय व युरोपियन भाषांचे मूळ एकच असले पाहिजे याविषयी संशोधन केलेले आहे. आणखीन महत्त्वाचे म्हणजे सर्वच राजकीय पक्षांच्या धुरीणांना लाज वाटली पाहिजे अशा दुर्लक्षित परंतु अत्यंत महत्त्वाच्या 'मनुस्मृती'ला त्यांनी मानाचा मुजरा केलेला आहे ! - संपादक*

२८ सप्टेंबर १७४६: सर विल्यम जोन्सचा लंडनमधील वेस्टमिन्स्टर येथे जन्म. विल्यम जोन्सच्या वडिलांचं नावही विल्यम जोन्स. त्यांचं कुटूंब मूळचे गलसीचे, पण कामानिमित्त लंडनजवळ स्थाईक. (मुलगा) विल्यम जोन्स ३ वर्षांचा असतानाच वडील वारले. आईने मुलाचे शिक्षण हॅरो आणि ऑक्सफर्डमध्ये पूर्ण केले. लहानपणापासूनच विल्यमला भाषांची आवड. इंग्रजी, वेल्श, ग्रीक, लॅटीन, फ्रेंच, संस्कृत, अरबी, आणि फारसी तो नीट लिहू-वाचू शकत असे !


शिक्षण संपल्यावर त्याने अर्ल ऑफ स्पेन्सरच्या मुलाचा शिक्षक आणि भाषांतरकार म्हणून नोकरी पत्करली. १७७० मध्ये त्याने डेन्मार्कच्या राजाच्या आज्ञेवरून इराणच्या नादिरशहाच्या (तोच तो दिल्ली आणि कोहिनूर लुटणारा!) इतिहासाचे फारसीतून फ्रेंचमध्ये भाषांतर करून पुस्तक छापले. हे काम संपल्यावर त्याला कायद्याचे शिक्षण घ्यावेसे वाटले. ३ वर्षे तो कायदा शिकला. वेल्समध्ये कनिष्ठ जज म्हणून त्याची नेमणूक झाली पण त्याला ते काम खास आवडत नव्हतं. अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धाची चळवळ तेव्हा जोर धरू लागली होती. बेंजामिन फ्रँकलिनसोबतही त्याने वसाहतींच्या मागण्यांवर काम केलं पण त्यात यश आलं नाही. २० मार्च १७८३ ला त्याला 'सर'की मिळाली आणि लगेच एप्रिल १७८३ मध्ये त्याने न मारीया शिपलेसोबत लग्न केलं. ह्याच महिन्यात कलकत्त्यातल्या कोर्टात त्याची जज्ज म्हणून नेमणूक झाली. २५ सप्टेंबर १७८३ रोजी तो कलकत्त्यात आला.

१७८४ मध्ये त्याने एशियाटिक सोसायटीची स्थापना केली आणि पुढची १० वर्षे तिचे कामही बघितले. ह्या १० वर्षांत अनेक भारतीय भाषांमधले ग्रंथ भाषांतरित करून सोसायटीने छापले. 'भारतीय आणि युरोपीयन



सेंट पॉल्स कॅथेड्रलमधला विल्यम जोन्स आणि युनिव्हर्सिटी चर्च ऑफ सेंट मेरी द व्हर्जिन मधला विल्यम जोन्स



ADVERTISEMENT.

THIS book is the firſt ever printed in *Sanſcrit*; and it is by the preſs alone, that the ancient literature of *India* can long be preſerved: a learner of that moſt intereſting language, who had carefully peruſed one of the popular grammars, could hardly begin his courſe of ſtudy with an eaſier or more elegant work than the *Ritusanhára*, or *Aſſemblage of Seaſons*. Every line compoſed by CALIDAS is exquiſitely poliſhed, and every couplet in the following poem exhibits an *Indian* landſcape, always beautiful, ſometimes highly coloured, but never beyond nature: four copies of it have been diligently collated; and, where they differed, the cleareſt and moſt natural reading has conſtantly had the preference.

सर विल्यम जोन्स आणि त्याच्या १७९२च्या संस्कृत पुस्तकाची जाहिरात

सोप्यातले सोपे कामही अविचाराने केल्यास अधिक अवघड बनते...

भाषांचे मूळ एकच असले पाहीजे' हा त्याचा विचार होता आणि त्यादृष्टीने त्याने आयुष्यभर संशोधन केले.

१७९२ मध्ये त्याने कालिदासाच्या 'ऋतूसंहार' ह्या संस्कृत काव्याचे इंग्रजीत भाषांतर करून त्याचे पुस्तक छापून घेतले. संस्कृत भाषेतलं हे पहिलं छापील पुस्तक – आजही लंडनमधल्या रॉयल एशियाटिक सोसायटीने जपून ठेवलेलं आहे.

जाता जाता थोडंसं काहीतरी वेगळं. आज भारतात कोणत्या पुतळ्याच्या हातात मनुस्मृती असलेली ऐकली किंवा पाहिली आहे का? छे – शक्यच नाही. जाळून टाकायच्या लायकीचं पुस्तक ते. वाचणं तर लांबच. होय ना? मग हे पुढचं वाचाच. ह्या विल्यम जोन्सच्या एका कामाची वाखाणणी इंग्लंडमध्ये भरपूर झाली – तो म्हणजे त्याचा मनुस्मृतीचा अभ्यास. लंडनच्या सेंट पॉल्स कॅथेड्रलमध्ये विल्यम जोन्सचा पुतळा आहे. हातात काय आहे? मनुस्मृती! कशावरून? तर त्यावर देवनागरीत 'मनु:' हे लिहिलेलं आहे. (सेंट पॉल्समध्ये भगीरथ ऋषी आणि गंगा ह्यांचेही पुतळे आहेत – त्याबद्दल नंतर कधीतरी!) ऑक्सफर्डला कधी गेलात तर तिथल्या युनिव्हर्सिटी चर्च ऑफ सेंट मेरी द व्हर्जिन मध्येही विल्यम जोन्सचा पुतळा आहे. हातात काय? मनुस्मृती – म्हणजे भारतात जो ग्रंथ पायदळी तुडवला जातो त्याचा परधर्मीय इंग्लंडमध्ये सन्मान होतो! आहे की नाही गंमत? ही गंमत आहे, की आपल्या काही विशिष्ट राजकारणी लोकांचा अपप्रचार? ह्यावर विचार करायची वेळ मात्र नक्कीच आलेली आहे !

सुज्ञांस अधिक काय सांगणे. इत्यलम्!

**– संकेत कुलकर्णी**
लंडन

•••

(पृष्ठ क्र. १० वरून – **पुराचित्रांचे 'भीम' संशोधक : डॉक्टर हरिभाऊ वाकणकर**)

२००५–०६ पासून भारत सरकार 'संचालनालय पुरातत्त्व अभिलेखागार व संग्रहालय' यांच्या वतीनं पुरासंपदा संरक्षण व पुरातत्त्विक संस्कृती रक्षणाच्या क्षेत्रात रचनात्मक व सृजनात्मक, विशेष उल्लेखनीय कार्य करणाऱ्या एका व्यक्तीस दरवर्षी 'डॉक्टर विष्णू श्रीधर वाकणकर सन्मान पुरस्कार' दिला जातो. दोन लाख रुपये व सन्मानपत्र असं याचं स्वरूप आहे.

असा हा खंदा पुरातत्त्व संशोधक मनानं सदैव कलेच्या जवळ होता. संधी व वेळ मिळेल तेव्हा त्यांच्यातील मूळ कलाकारवृत्ती उफाळून येई. हातात पेन्सिल कुंचला घेऊन चित्रं काढण्यात ते रममाण होत.

१९८८ साली सिंगापूरला एका हिंदू संमेलनानिमित्त हरिभाऊ गेले होते. तिथल्या हॉटेलच्या गॅलरीत बसून ते समोर दिसणारं निसर्गचित्र रेखाटत होते. त्यांच्या ४ एप्रिलच्या नियोजित कार्यक्रमाला ते गेले नाहीत म्हटल्यावर त्यांचा शोध सुरू झाला. हातातली पेन्सिल खाली पडलेली व मांडीवर अर्धवट काढलेलं समुद्राचं चित्र अशा स्थितीत ते गॅलरीत आढळले. ३ एप्रिललाच या सरस्वतीच्या संशोधकानं सरस्वतीच्या सेवेत असतानाच अखेरचा श्वास घेतला.

**– विनीता तेलंग**
ज्येष्ठ लेखिका
मुंबई
भ्रमणध्वनी : ९८९०९२८४११

•••

***दिशा संपर्क दूरध्वनी***
***०२२-२५४२ ६२७०***

# साध्या, सखोल कविता...

*कविता या काव्यप्रकाराविषयी त्यांचा अभ्यासपूर्ण असा, ज्येष्ठ समीक्षक डॉ. आनंद कुलकर्णी यांचा विशेष लेख – संपादक*

मला कवींच्या लेखनाविषयी नेहमीच असूया वाटत आली आहे आणि आपण असं लिहू शकत नाही याचं वैषम्य वाटत आलं आहे. समीक्षेचा विद्यार्थी असल्यामुळे तर अशी जाणीव अधिकच होत राहते. असो. गायक जसा कलावंत असतो तसा कवीही कलावंत असतो. गायक त्याच्या/तिच्या गाण्यात अन्यथा अमूर्त असणाऱ्या स्वरांची रूपं जशी एखाद्या आलापातून किंवा तानेतून दाखवतो/ते तसा कवीही जगण्यातील विविध अनुभवांचा पट उलगडून दाखवतो/ते. कवीच्या लेखनात विद्या कमी व कला जास्त असते. ह्या कलेलाच आपण 'प्रतिभाशक्ती' वगैरे म्हणतो. अशी कला जी जीवनातील अणूहून लहान आणि आकाशाहून मोठ्या असलेल्या अनुभवाकडे बघण्याची विलक्षण वेगळी दृष्टी देते. म्हणूनच कवी एका अर्थी तत्त्वज्ञ असतो. कवीला जीवनातील विसंगती, विरोध यांकडे कसं बघायचं ते कळतं, तेव्हा तो/ती 'तत्त्वज्ञ' असतात आणि कळलेलं शब्दांत कसं मांडायचं हे जमतं तेव्हा 'कवी असतात'. असं प्रत्येकवेळी घडून येतं असं नाही. पण जेव्हा घडतं तेव्हा खोलवर परिणाम करणारी साहित्यकृती तयार होते. ती साधी असूनही सखोल असते. साध्या शब्दांत खोल आशय! ...flash upon that inward eye असं विल्यम वर्डस्वर्थ म्हणाला तेव्हा हेचं घडलं असावं. मी काही दिवसांपासून गदिमा आणि राल्फ वाल्डो इमर्सन (१९ व्या शतकातील अमेरिकन कवी) यांच्या कविता वाचतोय. त्यातील दोन अतिशय साध्या कवितांनी माझ्यावर भुरळ घातली. गदिमांची 'एका तळ्यात होती' आणि इमर्सनची 'The Mountain and the Squirrel' या दोन कविता. या कविता अशी अंतर्दृष्टी देतात की, जगण्याचं परिमाणच बदलून जातं. सरळ साध्या, छोट्या रचना! या दोन्ही रचनांमधे एक अंत:स्थ संगती आहे. गदिमांची रचना 'आपली आपल्याला झालेली ओळख' सांगते, तर इमर्सनची रचना ओळख पटल्यावर 'आपल्या अस्तित्वाचं प्रयोजन' सांगते. गदिमांची रचना 'आपण कोणं?' हे सांगते, इमर्सनची कविता 'आपण कशासाठी आहोत?' हे सांगते. गदिमांची कविता इतरांनी कुरूप ठरवलेल्या व्यक्तितलं सौंदर्य दाखवते, इमर्सनची लहान आकार म्हणून हेटाळणी झालेल्या व्यक्तितील सामर्थ्य दाखवते. वेगळेपण वाईट नसतं, अपरिचित सामर्थ्याचं ते निदर्शक असतं असं या दोन्ही कविता सांगतात.

गदिमांची रचना ही खरं तर एक बालगीत म्हणून आपण ऐकलेली आहे. पण वाचल्यावर ते बालगीत राहात नाही. त्यातून आकाशाएवढा आशय व्यक्त होतो. तळ्यांतील बदकं आणि एक कुरूप पिल्लू याचे किती संदर्भात अर्थ लावणार आपण? सुमार लोकांमधे राहून आपण अगदीच कुचकामी आहोत अशी खंत बाळगणाऱ्यांसाठी ही कविता आहे? की वरवरचं, बेगडी सौंदर्य मिरविणाऱ्या लोकांमधे खरं सौंदर्य असूनही विमनस्क जगणाऱ्यांसाठी? लोक म्हणतात म्हणून आपल्यात दोष असतात, की आपले गुणं इतरांना खूपतात म्हणून आपल्याला टोचे बसतात? आपली संगतच आपली क्षमता मारून टाकते का? ही कविता कितीतरी संदर्भ सुचवत राहते. आपली ओळख इतरांवर अवलंबून असते का? इतरांनी आपल्याला जगण्याची चौकट आखून

दिलेली असते आणि त्यांच्या प्रतिसादावर आपल्या असण्याचं चांगलं-वाईटपणं सिद्ध होतं राहतं. सुमार लोकांच्या संगतीत आपल्याला सुमार दर्जाचीच दृष्टी मिळणार आणि वागणूकही. सुमार लोक तुम्हाला वाळीतच टाकणार, एकटं पाडणार, तुमच्यातल्या उणीवा दाखवून तुमचं खच्चीकरण करणार. सॉक्रेटिस, बुद्ध, ज्ञानेश्वर, तुकाराम यांचं हेच झालं. कुरूप कुब्जा हे असंच अपमान, तुच्छतेचं उदाहरण आहे. पण यांतील प्रत्येकाने स्वत:च्या मनात डोकावून आपापलं जीवनध्येय निश्चित केलं. इतरांची मोजपट्टी आपण आपल्यासाठी किती दिवस वापरणार? एक दिवस आपलं आपल्याला कळलं पाहिजे की आपण कोण आहोत आणि आपल्या क्षमता काय आहेत! जगण्याचं तळं तेच राहणार, बदकं तीच राहणार, पिल्लूं कुरूपच असणारं आणि टोचे बसतच राहणारं. जगायचं तर हे सगळं अटळ आहे. पण म्हणून कधीतरी आपल्याला स्वत:त डोकावून बघावंच लागेल ना! मग आपण राजहंस आहोत हे आपल्याला कळेल. आपण वेगळे आहोत म्हणजे वाईट आहोत असं नाही. आपण वेगळे आहोत म्हणजे आपल्यात वेगळी क्षमता आहे. सौंदर्य मनात आणि मनाचं आहे. शरीराच्या सौंदर्याचं काय, ते फसवं आणि बेगडी आहे. असा आपल्यातला राजहंस आपल्याला शोधावाच लागेल. त्यामुळे वरवरची कुरूपता हे खरं तर मनाचं सौंदर्य आहे हे कळेल. साध्या शब्दांत सखोल आशय! कमाल आहे गदिमांच्या प्रतिभेची. सलाम त्यांच्या प्रतिभेला!

एका तळ्यात होती बदके पिले सुरेख
होते कुरूप वेडे पिल्लू तयांत एक

कोणी न त्यास घेई खेळावयास संगे
सर्वांहुनी निराळे ते वेगळे तरंगे
दावुनी बोट त्याला म्हणती हसून लोक,
'आहे कुरूप वेडे पिल्लू तयांत एक'

पिल्लास दु:ख भारी भोळे रडे स्वतःशी
भावंड ना विचारी सांगेल ते कुणाशी?
जे ते तयास टोची, दावी उगाच धाक
होते कुरूप वेडे पिल्लू तयांत एक

एके दिनी परंतु पिल्लास त्या कळाले
भय वेड पार त्याचे वाऱ्यासवे पळाले
पाण्यात पाहताना चोरूनिया क्षणैक
त्याचेच त्या कळाले - तो राजहंस एक !...

इमर्सनची कवितासुद्धा बालगीतासारखीच आहे. अतिशय साध्या इंग्रजीत लिहिलेली, कोणालाही कळेल अशी. त्यात पर्वत आणि खार यांच्यामधील संवाद आहे. ही साधी कविता फार मोठा आशय व्यक्त करते. पर्वताला स्वत:च्या राक्षसी आकाराचा खूप गर्व आहे. आणि पर्वत जेव्हा लहान आकाराची खार बघतो तेव्हा त्याचा गर्व फुगत जातो. 'आकार लहान असूनही खार स्वत:ला श्रेष्ठ समजते अशी खोचक टिप्पणी' पर्वत करतो. जणू खार किती क्षूद्र आहे हेच पर्वताला सुचवायचंय. आपल्याकडच्या क्षमता इतरांना क्षूद्र ठरवण्यासाठी असतात का? तुम्ही बुद्धीमान, शक्तीमान, सत्ताधारी आहात म्हणजे तुमच्या भोवतालची माणसं कस्पटासमान होतात का? एखादी क्षमता तुमच्याकडे अधिक आहे म्हणजे इतर सगळे तुच्छ आहेत का? असे अनेक कळीचे प्रश्न ही कविता विचारते आणि शेवटी त्यांची उत्तरेही देते. जगणं एकविध आणि एकांगी नाही; ते बहुविध आणि अनेकांगी आहे. तुमची क्षमता इतरांच्या जगण्याचं मोल ठरवू शकत नाही. कारण इतरांकडेही जगण्याची क्षमता आणि प्रयोजन असतं. प्रत्येकाला क्षमता मिळालेलीच असते. ती तुमच्यापेक्षा वेगळी आहे म्हणून श्रेष्ठ किंवा कनिष्ठ ठरत नाही. प्रत्येकाचं अस्तित्व महत्त्वाचं आहे आणि ते कोणत्यातरी क्षमतेने सिद्ध झालेलं असतं. पर्वताचा आकार अजस्र

आहे हे खारीला मान्य आहे आणि तिचा आकार खूप लहान आहे हेही मान्य आहे. पण त्यामुळे तिला पर्वताचा हेवा वाटत नाही, की स्वत:चा तिरस्कार वाटत नाही. खार तिचा लहान आकार मोठ्या अभिमानाने मिरवते कारण तो तिची क्षमता दाखवतो. खार जशी पर्वताएवढी मोठी होऊ शकत नाही तसा पर्वतही तिच्याइतका लहान होऊ शकत नाही. पर्वत खारीसारखा सरसर पळू शकत नाही. भली मोठी जंगलं पाठीवर मिरवणाऱ्या पर्वताइतकी खार मोठी नाही. पण पर्वतही खारीसारखा शेंगा फोडून खाऊ शकत नाही. दृष्टीकोनातला किती सकारात्मक आणि सुखद बदल आहे हा! पर्वत त्याच्या जागी मोठा, खार तिच्या जागी. एकासारखं दुसऱ्याला जमणार नाही. त्याची गरजही नाही. जो तो ज्याच्या त्याच्या परीने योग्य आणि सक्षम आहे. श्रेष्ठ-कनिष्ठ हा भेद सापेक्ष आहे आणि आपण निर्माण केलेला आहे. ‘Talents differ; all is well and wisely put’ ही ओळ अशी प्रगल्भ सकारात्मकता व्यक्त करते. जणू ती कवितेचा तोलनबिंदू. इमर्सनच्या प्रतिभेला सलामच करायला पाहिजे.

**The mountain and the squirrel**

The mountain and the squirrel
Had a quarrel,
And the former called the latter
'Little prig'.
Bun replied,
'You are doubtless very big;
But all sorts of things and weather
Must be taken in together
To make up a year
And a sphere.
And I think it no disgrace
To occupy my place.
If I'm not so large as you,
You are not so small as I,
And not half so spry :
I'll not deny you make
A very pretty squirrel track.
Talents differ; all is well and wisely put;
If I cannot carry forests on my back,
Neither can you crack a nut.'

किती साध्या आहेत या दोन्ही कविता; पण किती खोल आशय व्यक्त करतात! साध्या निवेदनातून जीवनाचं केवढं मोठं तत्त्वज्ञान सांगतात. खरं तर अशा कवितांचा अर्थ सांगायचा नसतो; त्या अनुभवायच्या असतात. कारण अर्थ सांगितला की त्यांचा अमर्याद अर्थविस्तार एका जागी बंदिस्त होतो. मला राहावलं नाही म्हणून लिहिलं.

**– डॉ. आनंद कुलकर्णी**

इंग्रजी विभाग प्रमुख
ग्रामोन्नती मंडळाचे कला विज्ञान व वाणिज्य
महाविद्यालय, वारुलवाडी, नारायणगाव
ता. जुन्नर, जि. पुणे - ४१०५०४

•••

दिशा नियमित वाचा.
आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.

जग भित्र्याला घाबरवते आणि घाबरवणाऱ्याला घाबरते !

# एक भरारी... अशीही

*युवराज वानखेडे या युवकाने जिद्दीने एक भरारी मारली ती नाऊमेद न होता. कारण त्याने ज्यांना मदत केली होती त्यांनी पाठ फिरवली पण हितसंबंधांच्या काहीनी मदत केली; म्हणून त्याने 'भरारी मारली' या हृदगताच्या संदर्भात – संपादक*

असे म्हटले जाते की, ''जेव्हा तुमची इच्छा असूनही तुम्ही हार मानत नाही तेव्हा जादू घडते. कारण कसे तरी ब्रह्मांड हट्टी हृदयाच्या प्रेमात पडते.''

हा लेख आज सादर करणार असलेली कथा मी जगलेली आणि लिहिली आहे. विद्या प्रसारक मंडळाच्या बी.एन.बांदोडकर विज्ञान महाविद्यालय मध्ये राहून आपले सर्व महाविद्यालय पूर्ण केलेले एक बांदोडकरवादी.

२०१६ मध्ये जेव्हा मी बांदोडकर महाविद्यालयात प्रवेश घेतला तेव्हा मला वाटले नव्हते की, या संस्थेचा माझ्या आवड, स्वप्नांवर आणि माझ्या आयुष्यातील अंतिम ध्येयावर इतका मोठा प्रभाव पडेल. मी अकरावीच्या PCMB गटात प्रवेश घेतला होता. त्यावेळी मी माझ्या मनात फक्त माझ्या करिअरला आकार देत होतो. बारावीनंतर मला आयुष्यात काय करायचे आहे याबद्दल मी जवळजवळ निश्चित झालो होते. या बद्दल जवळपास निश्चय केला.

फार पूर्वीपासून माझ्या आयष्यात एकच तत्त्वज्ञान होते. या तत्त्वज्ञानाने मला एक प्रश्न दिला आहे. कदाचित, तो प्रश्न, जर वाचकाने पुरेसा खोलवर विचार केला तर, त्याचे आयुष्य कायमचे बदलू शकेल ! मी तुम्हाला तो प्रश्न शेवटी देईन.

बऱ्याच काळापासून, मी एक अशी व्यक्ती आहे जिने नेहमीच जीवनाबद्दल खोलवर विचार केला आहे. माझ्या हायस्कूलच्या सुरुवातीच्या काळात, कदाचित मी ७वीत असताना, मी आमच्या जीवनातील मूलभूत गोष्टींचा विचार करायचो. वास्तवाचे प्रश्न, या विश्वाचा जन्म, मानव कशापासून बनला आहे, चेतना, देव!

हे असे प्रश्न आहेत जे मला शांत बसू देत नाहीत. आणि या प्रश्नांची उत्तरे शोधणे हेच मी माझे करिअर बनवले !

जेव्हा मला परदेशातील संधीबद्दल कळले, तेव्हा मला उत्सुकता वाटली आणि मला जाणून घ्यायचे होते की, मी संधी कशी शोधू ? तेव्हा मला शिष्यवृत्ती आणि परदेशातील प्रवेशाविषयी माहिती मिळाली.

सुरुवातीला मी विविध विद्यापीठांमध्ये अर्ज केला. काही विद्यापीठांमध्ये अर्ज-शुल्क होते, साधारणपणे १०,००० रुपये. तथापि, युनायटेड किंगडममधील बहुतेक विद्यापीठांसाठी कोणतेही अर्ज-शुल्क नाहीत. एकदा मी अर्ज केल्यानंतर, काही आठवड्यांनंतर मला विद्यापीठांकडून प्रवेशाची ऑफर पत्रे मिळू लागली. एकदा मला शेफिल्ड विद्यापीठाकडून MSc. खगोल भौतिकशास्त्रासाठी ऑफर मिळाल्यानंतर, मी 'नॅशनल ओव्हरसीज स्कॉलरशिप'साठी फॉर्म भरला. ही मुख्यतः कमी उत्पन्न असलेल्या अनुसूचित जातीच्या लोकांसाठी भारत सरकारकडून पूर्णपणे अनुदानीत शिष्यवृत्ती आहे. शिष्यवृत्ती अर्जाची विंडो दरवर्षी १५ फेब्रुवारीला उघडते आणि ३१ मार्च रोजी NOS (nosmsje.gov.in/Default.aspx) वेबसाइट पोर्टलवर बंद होते.

अर्जाच्या टप्प्यात खालील कागदपत्रे अपलोड करणे आवश्यक होते. १. जात प्रमाणपत्र. २. उत्पन्नाचा दाखला. ३. विद्यापीठाकडून बिनशर्त ऑफर लेटर. ४. पत्त्याचा पुरावा. इ. एकदा ही कागदपत्रे सादर केल्यानंतर, मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात शिष्यवृत्तीचे निकाल समोर येतात. एकदा यादी आल्यानंतर, दूतावास पडताळणी होते, जिथे भारतीय दूतावास उक्त विद्यापीठातील प्रवेशाची पडताळणी करते. आणि एकदा ते पूर्ण झाल्यावर सरकारकडून अंतिम पुरस्कार पत्र येते आणि त्यानंतर आम्ही व्हिसा आणि तिकिटांसाठी अर्ज करू शकतो. तो अंतिम टप्पा आहे.

आज, मी सर्व व्यवस्था केली आहे आणि यूकेला जाणार आहे. या प्रक्रियेदरम्यान, मला बऱ्याच लोकांनी मदत केली. या संपूर्ण प्रक्रियेदरम्यान माझे आई-वडील तितकेच चिंतेत होते आणि माझे वडील लोकांकडून मदत आणि आवश्यक कागदपत्रे मिळवण्यासाठी माझ्यासोबत घरोघरी धावले. तसेच सरकारी gazetted officers स्वाक्षऱ्या करायच्या असताना अनेकांनी सह्या देण्यास नकार दिला; तथापि, जर आमच्या धुमाळे सरांची मदत नसती तर मी ही प्रक्रिया लवकर केली नसती.

बाँड्स दरम्यान राजपत्रित अधिकारी आणि सरकारी कर्मचाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आवश्यक होत्या. धुमाळे सरांनी मला त्यांची स्वाक्षरी तर दिलीच, शिवाय इतर स्वाक्षऱ्यांसाठीही मदतीची व्यवस्था केली. त्यामुळे आमच्या धुमाळे सरांकडून मला सर्वाधिक मदत झाली असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही आणि मी त्यांचा खूप खूप आभारी आहे.

प्रक्रियेदरम्यान, मला आर्थिक मदत देखील आवश्यक होती, परंतु एक तत्त्वज्ञान शिकवले गेले. 'संकटेच लोकांचे खरे चेहरे दाखवतात.' जेव्हा मला पैशांची गरज होती, तेव्हा मी ज्यांना पैसे दिले होते त्यांनी पैसे परत केले नाहीत ! शेवटी हितसंबंधांच्या पैशांवर सर्व व्यवस्था मला करावी लागली आणि आवश्यक ते करावे लागले.

तर शेवटी, मी तुम्हाला एकच प्रश्न देतो आणि जर तुम्ही त्याबद्दल खोलवर विचार केला तर ते तुमचे आयुष्य कायमचे बदलू शकते. तर, हा प्रश्न आहे, - ''तुमच्या मते तुमच्या आयुष्यातील सर्वात मोठी गोष्ट कोणती आहे? शोधा. आणि आयुष्यभर याचा पाठपुरावा करा.''

माझ्या मते, सर्वात मोठा प्रश्न अस्तित्वाच्या वास्तवाचा आहे. जीवनातील मूलभूत प्रश्नांबद्दल. जीवन, प्रेम आणि चेतना बद्दल. मी अशा लोकांना ओळखतो ज्यांना वाटते की सर्वात मोठी गोष्ट वेगळी आहे आणि त्यांचे करिअर वेगळे आहे. त्यांच्यासाठी विश्वाचा शोध ही सर्वात मोठी गोष्ट असेल, पण त्यांची कारकीर्द 'कॉल सेंटर' आहे. कृपया त्यांच्यासारखे होऊ नका. तुमची आवड शोधा आणि आयुष्य किती सुंदरपणे उलगडते ते शोधा !

तर, शेवटी, मी एवढेच शिकलो की, आपण आपली आवड आणि आपल्या स्वप्नांचा पाठपुरावा केला पाहिजे परंतु आपण एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. ''हे तुम्हांला वाटते त्यापेक्षा कठीण असेल, कदाचित अशक्य सुद्धा वाटेल, परंतु ते तुम्हांला वाटेल त्यापेक्षा ते अधिक सुंदर असेल हे सत्य आहे !''

"I am waiting for the day when the boundaries would remain only on maps."

**- युवराज वानखेडे**

•••

# श्री वासुदेवानंद सरस्वती

*श्री टेंबेस्वामी म्हणजेच श्री वासुदेवानंद सरस्वती होत. आध्यात्मिक रस असणाऱ्या आणि नसणाऱ्यांना देखील प्रस्तुत लेख आवडेल. कारण यात मानवी जीवनाकरिता आवश्यक असणाऱ्या 'श्रद्धा' विषयाच्या अनुषंगाने श्री टेंबेस्वामींची माहिती सांगितली आहे. – संपादक*

श्री वासुदेवानंद सरस्वती ऊर्फ टेंबेस्वामी यांना सुद्धा दत्तभक्त दत्तगुरूंचाच अवतार मानतात. त्यांचा जन्म १८५४ साली सध्याच्या सिंधुदुर्ग जिल्ह्यातील माणगाव येथे झाला. त्यांच्या मातोश्रींचे नाव रमाबाई तर वडिलांचे नाव गणेशभट्ट असे होते. ते कऱ्हाडे ब्राह्मण होते. त्यांच्या आजोबांचे नाव हरिभट टेंबे होते. ते दत्तात्रेयांचे उपासक होते. अर्थात त्यामुळेच श्री वासुदेवानंद सरस्वतींचे पिता गणेशभट्ट यांच्यावर दत्तभक्तीचा प्रभाव पडला. दत्तात्रेयांनींच श्री वासुदेवानंद सरस्वतींच्या रूपाने रमाबाई व गणेशभट्ट या दाम्पत्याच्या पोटी जन्म घेतला असे मानले जाते. श्री वासुदेवानंद सरस्वती लहानपणापासूनच अतिशय बुद्धिमान होते. बाल्यावस्थेत त्यांना चारही वेद (ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद) पाठ होते. एवढेच नव्हे, तर त्यांना लहानपणीच हिंदू धर्मशास्त्रांविषयी दांडगे ज्ञान होते. यामुळे त्यांची एक विद्वान पंडित म्हणून लहान वयातच ख्याती झाली होती. असे म्हटले जाते की, त्यांचे वय एकवीस वर्षे एवढे असताना ते अन्नपूर्णा नामक कन्येशी विवाहबद्ध झाले. अन्नपूर्णाबाईंच्या पित्याचे नाव श्री बाबाजीपंत गोडे असे होते. काही स्रोतांमध्ये त्यांचा विवाह एकोणिसाव्या वर्षी झाला असे संदर्भ येतात. श्री वासुदेवानंद सरस्वती यांनी बालपणी संस्कृतचे धडे त्यांचे आजोबा श्री हरिभट्ट यांच्या मार्गदर्शनाखाली गिरवले.

टेंबेस्वामी नृसिंहवाडीस गेले असता त्यांना गोविंदस्वामी नामक दत्तभक्त भेटले. गोविंदस्वामी हे दत्तोपासक होते. त्यांनींच टेंबेस्वामींना दत्तात्रेयांची उपासना कशी करावी याबाबत मार्गदर्शन केले. आपणास गोविंदस्वामींबाबत विशेष अशी माहिती मिळत नाही. परंतु त्यांचे श्री क्षेत्र नृसिंहवाडी येथे वास्तव्य होते व तेथे त्यांनी ध्यानधारणा केलेली होती. श्री वासुदेवानंद सरस्वतींवर त्यांचे प्रेम होते. गोविंदस्वामींनी त्यांना वेदांताविषयी शास्त्रशुद्ध ज्ञान दिले होते. एवढेच नव्हे, तर त्यांनी आपल्याकडील अनेक ग्रंथ टेंबे स्वामींना दिले होते. गोविंदस्वामींची जेव्हा प्राणज्योत मालवली तेव्हा त्यांचा देह कृष्णामाईच्या पवित्र जलात विसर्जित करण्यात आला. गोविंदस्वामी ज्या ठिकाणी तप व ध्यानधारणा करत त्या ठिकाणास 'गोविंदपूर' असे म्हणतात. गोविंदस्वामींच्या पार्श्वभूमीबाबतची जास्त माहिती आपणास मिळत नाही.

श्री वासुदेवानंद सरस्वतींचा वेदांचा अभ्यास दांडगा होता. अतिशय लहान वयातच त्यांनी वेद अभ्यासात प्रावीण्य मिळविले होते. तसेच ध्यानधारणेसोबतच ते रंजल्या-गांजलेल्यांना मार्गदर्शन करत असत. दत्तभक्त असे मानतात की, साक्षात भगवान दत्तात्रेय टेंबेस्वामींशीं बोलत असत. अगदी याचप्रकारे वारकरी संप्रदायाचे अनुयायी म्हणतात की, विठू माउली संत नामदेवांसोबत संवाद साधत असत. अगोदर उल्लेख केल्याप्रमाणे त्यांचा हिंदू धर्मशास्त्राचा व वेदांचा दांडगा अभ्यास होता. ते रोज गुरूचरित्र वाचत असत. त्यांच्या या विद्वत्तेमुळे त्यांना लहान वयातच आसपासचे लोक 'शास्त्रीबुवा' असे संबोधत असत.

श्री नृसिंहसरस्वतींना श्री क्षेत्र नृसिंहवाडीविषयी फारच जिव्हाळा होता. हे ठिकाण म्हणजे साक्षात दत्तगुरूंचा अवतार असलेले श्री नृसिंह सरस्वती यांचे

काही काळासाठीचे निवास असलेले स्थान होते. श्री वासुदेवानंद सरस्वती यांचे नृसिंहवाडीस स्मृती मंदिर आहे. श्री वासुदेवानंद सरस्वती हिंदू धर्मियांसाठी पवित्र असलेल्या उज्जैन येथे देखील गेले होते.

वासुदेवानंद सरस्वती यांनी माणगाव येथे दत्तमंदिर उभारले होते. त्यांची अशी धारणा होती की, श्री नृसिंहवाडी व माणगावचे दत्तात्रेयांचे मंदिर एकरूपच आहेत, म्हणजे एकमेकांचा भाग आहेत.

श्री वासुदेवानंद सरस्वती यांनी संन्यास घेतल्यानंतर भारत भ्रमण केले होते. त्यांनी महाराष्ट्र, गुजरात व उत्तर भारतातील विविध धार्मिक स्थळांना भेटी दिल्या होत्या. ते कडक तपश्चर्येवर भर देत असत व उल्लेखनीय बाब म्हणजे त्यांनी पायी चालून भारत भ्रमण केले होते. उत्तरेत काशी पासून (उत्तर प्रदेश) दक्षिणेस रामेश्वरम् (तमिळनाडू) पर्यंत व पश्चिमेस द्वारकेपासून (गुजरात) पूर्वेकडील राजमहेंद्री (आंध्रप्रदेश) पर्यंत त्यांनी प्रवास केला होता. असे म्हटले जाते की, त्यांनी भारतभरात जवळ जवळ तेवीस ठिकाणी चातुर्मास केला होता. टेंबेस्वामींचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी विपुल लिखाण करून दत्तसंप्रदायाशी संबंधित अनेक ग्रंथांची निर्मिती केली. त्यामुळे या संप्रदायाच्या तत्त्वज्ञानाची बैठक मजबूत होण्यास मदत झाली. कुठल्याही पंथाला लोकमान्यता मिळण्यासाठी हे अत्यंत आवश्यक असते. सामान्य भक्तगणांना तर तत्सम पंथाच्या देवतेच्या उपासनेबाबत मार्गदर्शन तर लागतेच. आज दत्तसंप्रदायाला जे स्थान प्राप्त झाले आहे ते निर्माण करण्यात श्री वासुदेवानंद सरस्वती यांचे योगदान ठळकपणे दिसते. त्यांनी भारतातील विविध ठिकाणांना भेटी देऊन, तसेच चातुर्मास करून दत्तभक्तीचा दंडक घालून दिला असे म्हणणे उचित ठरेल.

श्री वासुदेवानंद सरस्वती यांचे दत्तसंप्रदायाप्रती नजरेत भरण्यासारखे काम म्हणजे त्यांनी या संप्रदायाची निर्माण केलेली ग्रंथसंपदा हे होय. त्यांनी लिहिलेल्या काही ग्रंथांची नावे पुढीलप्रमाणे आहेत – श्रीगुरूदेव चरित्र, श्री दत्तमाहात्म्य, श्री दत्तचंपू इत्यादी. त्यांनी आपल्या पत्नीच्या निधनानंतर संन्यास स्वीकारला व उर्वरित आयुष्यभर संन्यस्त वृत्तीने राहिले. त्यांनी आपले संपूर्ण जीवन दत्तभक्ती व दत्तसंप्रदायाचा प्रसार व प्रचार करण्यासाठी वाहून घेतले. ते सतत एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी भ्रमण करत असत. भिक्षा मागून उदरनिर्वाह करत असत. त्याचप्रमाणे धर्मशास्त्राचे पालन करत असत. त्यामुळेच भक्तगण त्यांच्यात साक्षात दत्तप्रभूंचे प्रतिबिंब पाहत असत.

टेंबेस्वामींनी दत्तपरंपरेतील अनेक महान विभूतींना अनुग्रह दिला. यापैकी काही सत्पुरुषांची नावे पुढीलप्रमाणे आहेत – श्रीमत् प.प. श्रीनृसिंह सरस्वती, दीक्षितस्वामी महाराज, प. प. श्रीयोगानंद सरस्वती स्वामी, श्रीरंगावधूत स्वामी महाराज, श्रीनारायण दत्तानंद स्वामी महाराज, श्रीपेंढारकर स्वामी महाराज, श्री गुळवणी महाराज. या महान विभूतींना टेंबेस्वामींचा आशीर्वाद लाभलेला होता.

श्री वासुदेवानंद सरस्वतींचे अतिशय महत्त्वाचे कार्य म्हणजे असे म्हटले जाते की, त्यांनी श्रीपाद श्रीवल्लभांचे जन्मस्थान असलेले आंध्रप्रदेशातील पीठापूर व श्री नृसिंहसरस्वती यांचे जन्मगाव असलेले कारंजा ही गावे शोधून काढली. तद्नंतर तेथे दत्तप्रभूंची उपासना करण्याची सुरुवात झाली. याचे श्रेय श्री वासुदेवानंद सरस्वती यांनाच जाते. टेंबेस्वामींमुळेच ही दत्तस्थाने नव्हे, दत्तप्रभूंचा अवतार मानल्या गेलेल्या विभूतींची पवित्र स्थाने दत्तभक्तांना कळू शकली. त्यांनी श्री क्षेत्र नृसिंहवाडी, औदुंबर व गाणगापूर या दत्तगुरूंच्या ठिकाणी दत्तउपासनेला योग्य दिशा व बैठक बसवून दिली.

श्री वासुदेवानंद सरस्वती यांचा धर्मशास्त्र व संस्कृत ग्रंथांचा गाढा अभ्यास होता. ते सतत भ्रमण करत असत. परंतु त्यांची भ्रमंती चालू असताना देखील ग्रंथ लिखाणाचे काम अविरतपणे चालू असे. त्यांच्या या दांडग्या अभ्यासामुळे, प्रखर बुद्धिमत्तेचे व प्रचंड लिखाणामुळे भक्तमंडळी त्यांना आद्य शंकराचार्यांचे

रूपदेखील मानत. पुण्यामधील श्री वामनराव प्रकाशन संस्थेतर्फे टेंबेस्वामींचें बहुतांश साहित्य छापण्यात आले आहे. ही सदर प्रकाशनाची हिंदूंसाठी व प्रामुख्याने दत्तसंप्रदायींसाठी एक पर्वणीच होय.

श्री वासुदेवानंद सरस्वतींच्या चातुर्मासांविषयी येथे सांगणे उचित ठरेल. महाराजांनी आपल्या संन्यस्त जीवनात अनेक चातुर्मास केले. काही दाखल्यांनुसार त्यांनी आपला पहिला चातुर्मास भारतवर्षातील एक पवित्र स्थळ मानला गेलेल्या उज्जैन अर्थात उज्जयिनी येथे केला. असे म्हटले जाते की, संन्यास्यांचे वय त्यांनी जीवनभरात किती चातुर्मास केले यावरून मोजले जाते. श्री वासुदेवानंद सरस्वती यांनी उज्जयिनी येथील आपला पहिला चातुर्मास इसवीसन १८९१ साली केला याचाच अर्थ हिंदू पंचांगाप्रमाणे शके १८१३ मध्ये केला. असे म्हटले जाते की, महाराजांनी हा चातुर्मास येथील हरसिद्धी दत्तमंदिरात केला.

टेंबेस्वामींचा दुसरा चार्तुमास गंगा नदीच्या तीरावरील बह्मावर्त येथे झाला. त्यांनी येथेच आपले बारावे, तेरावे व चौदावे असे एकूण चार चातुर्मास केले. ब्रह्मावर्त येथील पहिला व एकूण क्रमवारीतील दुसरा चातुर्मास महाराजांनी १८९२ मध्ये म्हणजेच शके १८१४ साली केला. ब्रह्मावर्त हे ठिकाण उत्तर प्रदेश या राज्यातील कानपूर येथे गंगा नदीच्या तीरावर आहे. येथेच नानासाहेब पेशव्यांचा वाडा होता. येथे दुसरा चातुर्मास करत असताना टेंबेस्वामी अक्षरशः झोपडीत राहात होते. येथील अंताजीपंतांच्या घाटावर राममंदिराच्या बाजूस असलेल्या झोपडीत ते राहत असत. ते तीन घरांतून भिक्षा मागून आणत असत व भोजनग्रहण करत असत. त्यांच्या झोपडीचे द्वार सहसा बंदच असे व ते आत बसून ध्यानधारणा व इतर धार्मिक कृत्ये करत असत. ब्रह्मावर्त येथे दुसरा चातुर्मास करत असताना स्वामींचे येथे साधारणपणे आठ महिने वास्तव्य होते. असे मानले जाते की, येथेच टेंबेस्वामींनी दत्तपुराण नामक संस्कृत ग्रंथाचे लिखाण केले.

ब्रह्मावर्त येथील मुक्काम हलल्यानंतर महाराजांची पुन्हा एकदा भ्रमंती सुरू झाली व ते गोकुळ, मथुरा, वृंदावन अशा पवित्र धार्मिक ठिकाणी गेले. त्यानंतर शके १८१५ म्हणजेच इसवीसन १८९३ मध्ये हरिद्वार येथे आले. हरिद्वार हे ठिकाण सध्याच्या उत्तराखंड या राज्यात आहे. या राज्याला हिंदू भाविक 'देवभूमी' असे देखील म्हणतात. याचे कारण या राज्याच्या गढवाल भागात हिंदू धर्मियांसाठी अतिशय पवित्र असलेली यमनोत्री, गंगोत्री, बद्रीनाथ व केदारनाथ अशी धार्मिक स्थळे आहेत. हरिद्वारला या 'देवभूमीचे प्रवेशद्वार असे संबोधले जाते. १८९३ मध्ये टेंबेस्वामींनी हरिद्वार' येथे तिसरा चातुर्मास केला. हरिद्वारातील या चातुर्मासादरम्यान त्यांचा निवास गंगेच्या तीरावर असलेल्या दत्तमंदिरात होता. या ठिकाणी टेंबेस्वामींनी शारदा पीठाचे श्री राजेश्वरस्वामी शंकराचार्य यांना उपनिषदांविषयीचे आपले भाष्य व विचार ऐकविले. हरिद्वार येथील आपला चातुर्मास संपवून टेंबेस्वामींनी भाद्रपद पौर्णिमा संपल्यानंतर बद्रिनारायणाचे दर्शन घेण्याकरिता बद्रीनाथाकडे प्रस्थान केले असे म्हटले जाते. बद्रिनारायणाचे दर्शन घेण्याकरिता जात असताना त्यांनी हृषीकेश, देवप्रयाग, रूद्रप्रयाग, गुप्तकाशी आदी पवित्र ठिकाणांना भेटी दिल्या. तद्नंतर ते मोठ्या नैसर्गिक संकटांना तोंड देऊन बद्रीनाथला पोहोचले व तेथे त्यांनी अगदी जवळून नरनारायणाचे दर्शन घेतले. त्यांनी यावेळी गंगोत्रीला जाऊन पवित्र स्नान केल्याचे सांगितले जाते. श्री वासुदेवानंद सरस्वती यांनी याच काळात साधारणपणे १८९४-९५ व १८९६ मध्ये चौथा व पाचवा चातुर्मास केला असे म्हटले जाते.

(क्रमशः)

**- सहा. प्राध्यापक सुभाष गंगाराम शिंदे**
उपप्राचार्य व इतिहास विभागप्रमुख
विप्रमंचे जोशी-बेडेकर (स्वायत्त), महाविद्यालय,
ठाणे (पश्चिम) - ४००६०६
भ्रमणध्वनी : ९८२०३२८२२६
Email : subhashinscotland@gmail.com

# परिसर वार्ता

**- संकलित**

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, माध्यमिक विभाग

- रविवार दि. ३० जुलै २०२३ रोजी प्रेरणा व्यक्तिमत्त्व विकास प्रशिक्षण संस्था, आयोजित गुणवंत विद्यार्थ्यांचा व गुणवंत शाळेचा सत्कार सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले. डॉ. बेडेकर विद्या मंदिर मा. वि. ठाणे गुणवंत शाळेचे सन्मानचिन्ह आमदार मा. श्री. संजय केळकर साहेब यांच्या शुभहस्ते दिले.




- शनिवार दि. ०५/०८/२०२३ रोजी लोकमान्य टिळक पुण्यतिथी कार्यक्रम ७ वी च्या विद्यार्थ्यासमोर साजरा करण्यात आला. कार्यक्रमाला पर्यवेक्षिका सौ. बोऱ्हाडे बाई उपस्थित होत्या. इ ५ वी ते १० वी सर्व बक्षीसपात्र विद्यार्थ्यांनी भाषण केले. तसेच लोकमान्य टिळक पुण्यतिथी निमित्त शाळेत वक्तृत्व व हस्ताक्षर स्पर्धा घेण्यात आली. दोन्ही विभागात स्पर्धा आणि कार्यक्रम संपन्न झाला.



- नवभारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत साक्षर निरक्षर तसेच शालाबाह्य विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण दि. १७/०८/२०२३ ते २९/०८/२०२३ या कालावधीत शाळेला नेमून दिलेल्या परिसरात प्रत्येक शिक्षकांनी १०० कुटुंबांचे सर्वेक्षण केले.

- **लाईव्ह व्याखान दि. १९ ऑगस्ट २०२३**

श्रीमती इंद्राणी सायन्स अकॅडमी सेंटर आयसर पुणे तर्फे भारताचे 'चंद्रयान - ३' या विषयावर दि. १९ ऑगस्ट २०२३ रोजी प्रोफेसर भास बापट यांचे लाईव्ह व्याखान आयोजित केले होते. आपल्या शाळेत इ. ७ वी व ९ वी च्या विद्यार्थ्यासाठी सकाळी ११ ते १२ या वेळेत चित्रकला वर्ग व संगणक कक्षात हे व्याख्यान ऐकण्याची सुविधा उपलब्ध करून दिली होती. हे व्याखान विद्यार्थी उत्सुकतेने ऐकत होते.

- **डॉ. बेडेकर विद्यामंदिर ठाणे – ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार**

दिनांक २३ ऑगस्ट २०२३ या दिवशी चंद्रयान तीन च्या लँडिंगचे थेट प्रक्षेपण शाळेतील विद्यार्थी व पालकांनी कॉम्प्युटर लॅब मध्ये संध्याकाळी सहा वाजता उपस्थित राहून या ऐतिहासिक क्षणाचा आनंद अनुभवला. चंद्रयान तीन चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर लँड झाल्याबरोबर सर्व विद्यार्थी शिक्षक व पालकांनी टाळ्यांच्या गजरात आनंद साजरा करून 'भारत माता की जय' अशा घोषणा देऊन आपला देशाभिमान व्यक्त केला.



- **डॉ. बेडेकर विद्यामंदिर ठाणे, शाळेतील विद्यार्थ्यांचा एक स्तुत्य उपक्रम**

दि. २७ ऑगस्ट २०२३ बुधवार रोजी शाळेत इयत्ता पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांनी हस्तकलेच्या तासाला तयार केलेल्या राख्यांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. या अंतर्गत विद्यार्थ्यांनी २५०० राख्या तयार करून प्रदर्शनात विक्रीसाठी ठेवलेल्या आहेत. या राख्यांची विक्रीही विद्यार्थीच करत असतात. या उपक्रमातून जमवण्यात येणारा निधी शाळेतील गरजू विद्यार्थ्यांसाठी वापरला जातो. या उपक्रमाचे उद्‌घाटन विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष माननीय डॉक्टर विजय बेडेकर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. तसेच मंडळाचे सर्व मा. सभासद उपस्थित होते.





- दि. २९ ऑगस्ट २०२३ रोजी निसर्गाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचे संस्कार रुजण्यासाठी विद्यार्थ्यामध्ये वृक्षबंधन व रक्षाबंधन कार्यक्रम शाळेत साजरा केला.



ठाणेवैभव

डॉ. बेडेकर विद्यामंदिरमध्ये वृक्षबंधन आणि रक्षाबंधन

ठाणे: शाळेत दरवर्षी पूर्व रक्षाबंधन समारंभ स्काऊट आणि गाईडच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित केला जातो. यावर्षी मंगळवार 29 ऑगस्ट 2023 रोजी हा समारंभ झाला.

या समारंभातून भाऊ-बहिणीच्या पवित्र नात्याचा संस्कार तसेच निसर्ग आपला रक्षणकर्ता म्हणून वृक्षाला राखी बांधून निसर्गाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा संस्कार विद्यार्थ्यांमध्ये रुजवला जातो. या समारंभाचे आयोजन शाळेतील स्काऊट गाईड [illegible] कल्पना [illegible] यांनी केले होते.

हा कार्यक्रम शाळेतील पदाधिकारी, स्काऊट गाईडचे विद्यार्थी आणि शिक्षक यांच्या उपस्थितीत शाळेतील मैदानात झाला. शेवटी सर्व विद्यार्थ्यांना खाऊ वाटण्यात आला.

- स्काऊट – गाईड विद्यार्थ्यांनी वाहतूक पोलिसांना राख्या बांधल्या.



- दि. ५ सप्टेंबर २०२३ रोजी शाळेत शिक्षक दिन साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी शिक्षक बनून अध्यापनाचे काम केले.

- शिक्षक दिनानिमित्त रोटरी क्लबने गायन स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेत आपल्या शाळेतील संगीत शिक्षिका सौ. कुलकर्णी, श्री. तळेले व सौ. झंझाड यांना सहभागाचे प्रमाणपत्र देण्यात आले.

- **एक पर्यावरण स्नेही उपक्रम**

पर्यावरण दक्षता मंच, ठाणे यांच्या सहकार्याने डॉक्टर बेडेकर विद्यामंदिर, ठाणे येथे दरवर्षी शाडूच्या मातीपासून गणपती तयार करण्याची कार्यशाळा विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात येते. यावर्षी सुद्धा या उपक्रमांतर्गत शुक्रवार दिनांक ८ सप्टेंबर २०२३ रोजी शाळेतील विद्यार्थ्यांनी गणपतीच्या आकर्षक मूर्ती तयार केल्यात. या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे विद्यार्थी आपल्या घरी गणेशोत्सवामध्ये या मूर्तींची प्रतिष्ठापना करणार आहेत. अशा उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाच्या संवर्धनाची जागरूकता आणि आपल्या जबाबदारीची जाणीव निर्माण करण्यात येते.



मनाला आनंद देण्याचा कोणत्याही पदार्थाचा गुण म्हणजेच सौंदर्य.

- **डॉ. बेडेकर विद्या मंदिर, ठाणे येथील भरडधान्य उत्सव**

भारत सरकारने संयुक्त राष्ट्रसंघासह सन २०२३ हे आंतरराष्ट्रीय भरड धान्य वर्ष (म्हणजेच मिलेट्स वर्ष) घोषित केले आहे. त्यानिमित्ताने शाळेत शुक्रवार दिनांक ८ सप्टेंबर २०२३ रोजी भरड धान्य उत्सव साजरा करण्यात आला. त्या अंतर्गत इयत्ता पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी भरड धान्यांचे प्रदर्शन आयोजित केले होते. या प्रदर्शनातून विद्यार्थ्यांनी भरड धान्यांची ओळख करून दिली, तसेच त्यातील पौष्टिक घटकांची माहिति सर्वांना करून दिली. इयत्ता आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी याच भरड धान्यांच्या पाक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या अंतर्गत विद्यार्थ्यांनी धान्याच्या विविध नाविण्यपूर्ण पाककृती सादर केल्या. या उपक्रमाला बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या माननीय डॉक्टर विंदा मांजरमकर यांना प्रमुख पाहुण्या म्हणून आमंत्रित केले होते. त्यांनी विद्यार्थ्यांना भरड धान्यांबद्दल महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले.



ठाणेवैभव

डॉक्टर बेडेकर विद्यामंदिरमध्ये भरडधान्य उत्सव

ठाणे: भारत सरकारने संयुक्त राष्ट्रसंघासह सन 2023 हे आंतरराष्ट्रीय भरड धान्य वर्ष (म्हणजेच मिलेट्स वर्ष) घोषित केले आहे. त्यानिमित्ताने शाळेत शुक्रवार 8 सप्टेंबर 2023 रोजी भरड धान्य उत्सव साजरा करण्यात आला.

या उपक्रमांतर्गत इयत्ता पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी भरड धान्यांचे प्रदर्शन आयोजित केले होते. या प्रदर्शनातून विद्यार्थ्यांनी भरड धान्यांची ओळख करून दिली. त्यातील पोष्टिक घटकांची माहिती सर्वांना करून दिली. इयत्ता आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी याच भरड धान्यांच्या पाक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या अंतर्गत विद्यार्थ्यांनी धान्याच्या विविध नाविन्यपूर्ण पाककृती सादर केल्या.

या उपक्रमाला बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. विंदा मांजरमकर यांना प्रमुख पाहुण्या म्हणून आमंत्रित केले होते. त्यांनी विद्यार्थ्यांना भरड धान्याबद्दल महत्वपूर्ण मार्गदर्शन केले. विद्या प्रसारक मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी या उपक्रमास भेट देऊन विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले.

विद्या प्रसारक मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी या उपक्रमास भेट देऊन विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले.

- **आदर्श शिक्षक पुरस्कार**

ब्राह्मण सेवा संघ ठाणे यांचे तर्फे शाळेतील कलाशिक्षक श्रीयुत वासुदेव वैद्य यांना दिनांक ९ सप्टेंबर २०२३ रोजी आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.




- इयत्ता सहावी सातवी आठवीचा दीक्षांत समारंभ स्काऊट गाईड प्रसंगी ठाणे जिल्हा संघटक श्री किरण लहाने सर ठाणे जिल्हा गाईड संघटक हे सौ हेमांगी देवरे, श्रीमती अल्मेडा मॅडम यांच्या हस्ते स्काऊट गाईड विद्यार्थ्यांना स्कार्फ प्रवेश बॅच देऊन वचन विधी घेण्यात आला. प्रसंगी स्काऊट मास्तर श्री जीवन जाधव श्री संजय तळेले गाईड कॅप्टन सौ साधना कारंडे-जोशी, सौ सुवर्णा चव्हाण, सौ आशालता गांगुर्डे, शाळेच्या उपमुख्याध्यापिका माननीय कल्पना वाघुले ह्या उपस्थित होत्या.



## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी पूर्व प्राथमिक विभाग

ऑगस्ट व सप्टेंबर महिन्यातील उपक्रमांचा हा आढावा.

☐ **१५ ऑगस्ट – स्वातंत्र दिन**

भारताचा ७७ वा स्वातंत्र्यदिन १४ ऑगस्ट रोजी शाळेत साजरा करण्यात आला. मुलांनी पुढीलप्रमाणे वेशभूषा केली होती.

- नर्सरी – झेंड्यांचे रंग असणारे कपडे.
- ज्युनियर के.जी. – तीन गटांना झेंड्यांचा १/१ रंगाचे कपडे (रोझ ग्रुप – पांढरा, जस्मीन ग्रुप – केशरी व लोटस ग्रुप – हिरवा)
- सिनियर के.जी. – थोर नेत्यांची वेशभूषा

मुलांनी झेंडे हातात घेऊन झेंड्याची व देशभक्तीपर गाणी गायली. सिनीयरच्या मुलांनी ज्या थोर नेत्याची वेशभूषा केली आहे त्यांच्याबद्दल १/२ ओळीत माहिती दिली.

या निमित्ताने ज्यूनियरच्या मुलांनी भारताने यशस्वी प्रक्षेपण केलेल्या चांद्रयानाला तिरंग्याच्या रंगांनी रंगवले तर नर्सरीच्या मुलांनी त्यावर कोलाज केले.

सिनीयरच्या मुलांनी पांढऱ्या कागदापासून कमळाचे फुल तयार करून त्याला तिरंग्याच्या रंगाने रंगवले.

### □ २१ ऑगस्ट – रक्षाबंधन

परिपाठाच्या तासात शिक्षकांनी नारळी पौर्णिमा, समुद्रापासून आपल्याला मिळणाऱ्या विविध गोष्टी, रक्षाबंधन याची माहिती दिली. ज्यूनियरच्या मुलांनी सोनेरी धागा व मणी वापरून राख्या केल्या. सिनीयरच्या मुलांनी घरून पालकांच्या मदतीने सुंदर राख्या बनवून आणल्या. नारळाची वडी मुलांना खाऊ म्हणून देण्यात आली.

### □ ४ सप्टेंबर – नर्सरी – केळे सोलणे.

प्रत्येक मुलाने घरून डब्यात १ केळं आणले होते. केळं स्वत:च किंवा शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली सोलून मुलांनी त्याचा आस्वाद घेतला.

### □ ६ सप्टेंबर – गोकुळाष्टमी/दहिहंडी

नटखट श्रीकृष्णाचा जन्म आणि दहिहंडी या बद्दल माहिती देणारी चित्रफीत (cartoon movie) मुलांना दाखवण्यात आली. ६ तारखेला मुलांनी कृष्णाचा, तर मुलींनी राधेचा वेश परिधान केला होता. मुलांनी कृष्णाची गाणी व श्लोक म्हटले. फुगे, काकडी, केळी व पानाफुलांनी सजवलेली हंडी नर्सरी, ज्यूनियरच्या मुलांसाठी उपडी करण्यात आली व सिनीयरच्या मुलांनी ती हंडी फोडली. दहिकाल्याचा प्रसाद सर्वांना देण्यात आला. 'गोविंदा रे गोपाळा' म्हणत मुलांनी दहिहंडीचा आनंद लुटला. या निमित्ताने मुलांनी ठसेकाम व चित्र रंगवून छान मुकुट तयार केले. घरी जाताना सर्व मुलांनी ते परिधान केले होते.

### □ ८ सप्टेंबर – खळ कालवून खेळणे

कणकेची सैलसर खळ शिजवून त्याच्यात मुलांना खेळायला दिले होते. मुलांच्या स्नायू विकासासाठी या उपक्रमाचा उपयोग होतो.

□ आमच्या विभागात साजऱ्या होणाऱ्या प्रत्येक सणाची आणि विशिष्ट दिवसांसाठी पुढील गोष्टी केल्या जातात.

- प्रवेशाजवळ व व्हरांड्यात संबंधित विषयाचे चार्ट आणि तोरणं लावली जातात.
- संगीत तासिकेला त्याविषयीची गाणी घेतली जातात.
- AV lesson च्या तासिकेला संबंधित चित्रफीती दाखवल्या जातात.
- परिपाठात विषयी माहिती दिली जाते.

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी प्राथमिक विभाग

### स्वातंत्र्यदिन

भारताच्या इतिहासातील सोनेरी पान म्हणजे १५ ऑगस्ट १९४७. प्रत्येक भारतीयासाठी महत्त्वपूर्ण असलेला दिवस म्हणजे स्वातंत्र्यदिन.

भारतीय स्वातंत्र्यदिनाविषयी काही विद्यार्थ्यांनी माहिती सांगितली. स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून भारतभूमी विषयी म्हणजेच राष्ट्रीय पक्षी, राष्ट्रीय प्राणी,

पहिले पंतप्रधान, राष्ट्रपती, आताचे पंतप्रधान, राष्ट्रपती. महत्त्वाच्या बाबी विद्यार्थ्यांना सांगण्यात आल्या.

'इतिहास का मैं आईना हूँ' या कवितेचे वाचन व 'नन्ना मुन्ना राही हूँ' हे गीत विद्यार्थ्यांनी उत्साहात सादर केले.

इ. १ ली चे विद्यार्थी स्वच्छतेवर आधारित संदेश देणारे घोषवाक्यांचे फलक घेऊन पूर्ण शाळेतील मुलांना जागृत केले. त्याविषयीचे ज्ञान दिले.

इ. २री व ३री च्या विद्यार्थ्यांची भारताशी निगडित सामान्य ज्ञानावर आधारित प्रश्नमंजुषा घेण्यात आली. ४ थी च्या विद्यार्थ्यांनी वर्तमानपत्रापासून कागदी गांधी टोपी करण्याचे प्रात्यक्षिक केले.

इ. ३ री व ४ थी च्या विद्यार्थ्यांना कब बुलबुल या विषयांतर्गत आपल्या तिरंगा झेंड्याची माहिती, देशाला स्वातंत्र्य मिळण्यासाठी झालेल्या घडामोडींविषयी माहिती देणारी ध्वनीचित्रफित दाखवण्यात आली.

**नारळीपौर्णिमा व रक्षाबंधन**

'सण आयलाय गो नारली पुनवेचा' या अतिशय मधुर अशा गीताच्या गायनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. नारळीपौर्णिमा हा कोळीबांधवांसाठी विशेष महत्त्वाचा असणारा सण. नारळीपौर्णिमा केव्हा, कशी साजरी केली जाते, नारळाचे कोणते पदार्थ या दिवशी केले जातात इ. माहिती विद्यार्थ्यांना दिली.

श्रावण महिन्यातील ह्याच दिवशी रक्षाबंधन हा सण साजरा केला जातो. बहीण-भावाच्या अतूट नात्याचा हा सण. रक्षाबंधन सणाची माहिती विद्यार्थ्यांना दिली गेली.

इ. १ली च्या वर्गात वर्गप्रतिनिधींनी शिक्षकांना राखी बांधली. आई ज्याप्रमाणे घरी आपली काळजी घेते, आपले रक्षण करते त्याचप्रमाणे शाळेत शिक्षिका मुलांची काळजी घेतात, त्यांचे रक्षण करतात, माया करतात या सुंदर भावनेतून ही राखी बांधण्यात आली.

**गोकुळाष्टमी**

खट्याळ, खोडकर, लडिवाळ, दही, दूध, लोणी पळवणारा असे वर्णन ऐकले की एकच नाव ओठावर येत ते म्हणजे श्रीकृष्ण.

पारंपरिक वेशभूषेत आलेल्या प्राथमिक विभागाच्या चिमुकल्यांनी अतिशय दणक्यात गोकुळाष्टमी उत्सव साजरा केला.

विद्यार्थ्यांनी कृष्णाची गोष्ट सांगितली. कृष्ण कसा खोडकर होता, त्याचे दह्या-दुधावरचे प्रेम याविषयी माहिती सांगितली. 'अच्युतम केशवम' ह्या सुंदर गीताचे गायन केले. या गीताने शाळेतील पूर्ण वातावरणच छान भक्तीमय व कृष्णमय झाले.

कार्यक्रमाची सांगता 'गोविंदा आला रे आला' च्या नादघोषाने झाली. इ. १ ली च्या विद्यार्थ्यांना कृष्णजन्माचा चित्रपट दाखवण्यात आला.

आमच्या छोट्या बाळगोपाळांनी गोकुळाष्टमीचा भरभरून आनंद लुटला.

## बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय (स्वायत्त)

**अन्न व औषधी प्रशासन यांच्या वतीने योग्य आहार-भारतीय भरड धान्य मेळा मोठ्या उत्साहाने संपन्न.....**

भारत सरकारच्या अन्न सुरक्षा व मानक अधिकार अंतर्गत अन्न व औषधी प्रशासन, ठाणे यांच्या वतीने विद्या प्रसारक मंडळाच्या बांदोडकर विज्ञान (स्वायत्त) महाविद्यालयाच्या पतंजली सभागृहात योग्य आहार - भारतीय भरड-धान्य-मेळा मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. सकाळी अन्न व औषधी प्रशासनाचे व्यंकटेश वेदपाठक यांच्या मार्गदर्शनाखाली व महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ.विंदा मांजरमकर, कॅप्टन बिपीन धुमाळे, सेवानिवृत्त प्रा. प्रकाश माळी व वर्षा आडे यांच्या उपस्थितीत एनसीसी, एन.एस.एस. व

इतर विद्यार्थ्यांची भारतीय भरड धान्य जनजागृती रॅली काढण्यात आली. यानंतर पतंजली सभागृहात संपन्न झालेल्या योग्य आहार–भारतीय भरड धान्य मेळा प्रसंगी प्रभारी प्राचार्या डॉ. विंदा मांजरमकर यांनी प्रास्ताविक केले. शिक्षणाधिकारी भाऊसाहेब कारेकर, ठाणे सिव्हिल हॉस्पिटलच्या डॉ.शितल नागरे, विनयकुमार आवटे, ग्राहक संरक्षण मंचचे गजानन पाटील, गणेश जोशी यांनी विद्यार्थ्यांना योग्य आहार–भारतीय भरड धान्य याविषयी मार्गदर्शन केले. यावेळी अन्न व औषधी प्रशासनाचे व्यंकटेश वेदपाठक, श्री.सूर्यवंशी, श्री.गोगावले, दीपक ढोकरे, उदय ताम्हाणे, वर्षा आडे उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ. ऊर्मिला कुमावत, सहाय्यक प्राध्यापक, वनस्पतीशास्त्र विभाग यांनी केले.



**कमवा आणि शिका योजनेचा प्रारंभ**

विद्या प्रसारक मंडळाच्या बा. ना. बांदोडकर विज्ञान स्वायत्त महाविद्यालय ठाणे आणि क्विकहील फाऊंडेशन व महाराष्ट्र सायबर यांच्या संयुक्त विद्यमाने माहिती तंत्रज्ञान व संगणक शास्त्र या विभागांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ‘कमवा व शिका’ या योजनेचा प्रारंभ करण्यात आला.

‘कमवा आणि शिका’ या योजनेमध्ये विद्यार्थी प्रथम क्विकहिल फाऊंडेशन कडून सायबर सुरक्षा विषयी प्रशिक्षण घेऊन इतर शाळा व महाविद्यालयांमध्ये जाऊन सायबर जागरूकता मोहीम राबवणार आहेत. दिनांक २९ ऑगस्ट २०२३ रोजी क्विकहील फाऊंडेशने बांदोडकर महाविद्यालयांमध्ये इच्छुक असणाऱ्या विद्यार्थ्यांना एक दिवसीय कार्यशाळेद्वारे ‘सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा’ अंतर्गत प्रशिक्षण दिले.

महाविद्यालयांच्या प्रभारी प्राचार्या डॉ.विंदा मांजरमकर यांनी कार्यशाळेचे प्रास्ताविक केले. तसेच महाविद्यालयाचे उपप्राचार्य आणि माहिती तंत्रज्ञान व संगणक विभागाचे प्रमुख प्राध्यापक अभिजीत काळे यांनी विद्यार्थ्यांना ‘कमवा व शिका’ या योजनेमध्ये सहभागी होण्यास प्रोत्साहित केले. महाराष्ट्र सायबर विभागातर्फे श्री.विजय सुतार आणि श्री.शैलेश साळुंखे यांनी सायबर गुन्ह्यांचे प्रकार, त्यावरील उपाययोजना, सायबर गुन्ह्यांपासून कसे सुरक्षित रहावे, तसेच सायबर गुन्ह्या घडला असल्यास तक्रार कशी करावी अशा विविध गोष्टींबाबत मार्गदर्शन केले. क्विकहील फाऊंडेशनच्या सीएआर सिनियर एक्झिक्युटिव्ह सुगंधा दानी यांनी सायबर सुरक्षेचे महत्त्व, तसेच सुरक्षा जागरूकता मोहीम शाळा आणि महाविद्यालयांमध्ये कशी राबवावी? समाजाच्या अगदी शेवटच्या घटकांपर्यंत सायबर सुरक्षा जागरूकता कशी पोहोचवावी? स्वतःला सायबर सुरक्षित कसे ठेवावे? अशा विविध गोष्टींबाबत मार्गदर्शन केले.या एक दिवसीय कार्यशाळेचे सूत्रबद्ध नियोजन प्राध्यापक अंकिता शिंदे आणि विद्यार्थी प्रतिनिधी आश्लेषा भोसले यांनी केले. या कार्यशाळेची सांगता राष्ट्रगीताने झाली.

**जागतिक हत्ती दिन**

जैवविविधता आणि वन्यजीव संवर्धन व व्यवस्थापन विभागातर्फे १२ ऑगस्ट २०२३ रोजी जागतिक हत्ती दिन साजरा करण्यात आला. सहाय्यक प्राध्यापक श्री. आदित्य म्हात्रे यांनी हत्तीबद्दल माहिती विडिओच्या माध्यमातून दिली. तसेच हत्तींच्या संवर्धनाची आवश्यकता स्पष्ट केली.



### ग्रंथालय विभाग

दिनांक ०१.०८.२०२३ रोजी अण्णाभाऊ साठे यांची जयंती, तसेच लोकमान्य टिळक पुण्यतिथी महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागामध्ये साजरी करण्यात आली. अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. तसेच यांच्यावरील माहितीचे पुस्तक - प्रदर्शन करण्यात आले होते.




दिनांक ०३.०८.२०२३ रोजी क्रांतिसिंह नाना पाटील यांची जयंती महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागामध्ये साजरी करण्यात आली. प्रा.वाघ आणि प्रा.धुमाळे यांनी प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. तसेच क्रांतिसिंह नाना पाटील यांच्यावरील माहितीचे प्रदर्शन करण्यात आले होते.



दिनांक १२ ऑगस्ट २०२३ रोजी रोजी भारतीय ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ एस.आर.रंगनाथन यांची जयंती महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागामध्ये साजरी करण्यात आली. ग्रंथपाल सौ कादंबरी मांजरेकर यांनी डॉ.एस.आर.रंगनाथन यांच्या कार्याबद्दल माहिती सांगितली. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ.विंदा मांजरामकर तसेच प्रा.अभिजित काळे यांनी प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. एस.आर.रंगनाथन यांच्यावरील माहितीचे तसेच पुस्तक प्रदर्शन करण्यात आले होते. या निमित्ताने ग्रंथालय विभागातर्फे आयोजित बुकमार्क स्पर्धेच्या विजेत्यांना प्रभारी प्राचार्या डॉ.विंदा मांजरामकर व उपप्राचार्य प्रा.अभिजित काळे यांच्या हस्ते पुस्तकरूपी भेट देऊन गौरवण्यात आले.



### विद्यार्थी उद्बोधन वर्ग

ग्रंथालयात विविध ज्ञानाचे स्रोत उपलब्ध आहेत. महाविद्यालयातील प्रथम वर्ष विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांना



या स्रोताबद्दल माहिती होण्याच्या दृष्टीने ग्रंथालय उद्बोधन सत्र १६ ऑगस्ट, १९ ऑगस्ट आणि २३ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आली होती. ग्रंथालयाचा ग्रंथसंग्रह, मासिके, नियतकालिके, वेब ओपेक, ग्रंथालयाच्या वेळा, विविध पारंपरिक, तसेच माहिती तंत्रज्ञानावर आधारित सेवा, पुस्तक पेढी योजना, ए संसाधने, प्लॅटफॉर्म याबद्दल विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. तसेच ही संकल्पना देखील समजावून सांगण्यात आली.

## विद्या प्रसारक मंडळाचे
## ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

**विद्या प्रसारक मंडळाचा स्थापना दिन**

दिनांक १ ऑगस्ट रोजी विद्या प्रसारक मंडळाचा स्थापना दिन साजरा करण्यात आला. वृक्षारोपणानी कार्यक्रमाची सुरुवात झाली. स्थापनेच्या क्रमानुसार प्रत्येक महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी वर्षभरात महाविद्यालयात घडलेल्या घडामोडींचा थोडक्यात अहवाल सादर केला. विधी महाविद्यालयाच्या वतीने महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार ह्यांनी अहवाल सादर केला. कार्यक्रमात प्रत्येक महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

**सत्र II ची परीक्षा**

| दिनांक | वेळ | विषयाचे नाव |
|---|---|---|
| १/८/२०२३ | सकाळी १०.३० ते दुपारी १.०० | लॉ ऑफ क्राईम |
| ३/८/२०२३ | सकाळी १०.३० ते दुपारी १.०० | भारतीय संविधान |
| ५/८/२०२३ | सकाळी १०.३० ते दुपारी १.०० | कौटुंबिक कायदे I |
| ७/८/२०२३ | सकाळी १०.३० ते दुपारी १.०० | पर्यावरण विषयक कायदे |

प्रथम वर्ष प्रवेशाचे वेळापत्रक CET समितीने अधिसूचित केले. आमच्या प्रवेश समितीने पदभार स्वीकारला आणि या फेरीत एकूण २००/२६४ जागा भरल्या गेल्या.

**प्रवेश समिती तपशील**

**तारखा :** १७ ऑगस्ट ते २२ ऑगस्ट प्रथम फेरी: १५२ प्रवेश

२५ ऑगस्ट ते २९ ऑगस्ट द्वितीय फेरी : ४८ प्रवेश

**पर्यावरण धोरण**

महाविद्यालयासाठी पर्यावरण धोरण तयार करण्यात आले. प्रा. सौ. कृष्णा कामत यांनी प्रभारी प्राचार्य डॉ. श्रीविद्या जयकुमार आणि आयक्यूएसी समन्वयक प्रा. श्री. विनोद वाघ ह्यांच्याकडून इनपुट घेऊन हे धोरण तयार केले. हे धोरण वैधानिक प्राधिकरणांसमोर मंजुरीसाठी ठेवण्यात आले आहे.

**४ जुलै २०२३... सत्र – V ओरिएंटेशन**

सेमिस्टर V च्या विद्यार्थ्यांसाठी २.३० ते ४.३० आणि ५.०० ते ७.०० या वेळेत ओरिएंटेशन घेण्यात आले.

प्रभारी प्राचार्य डॉ. श्रीविद्या जयकुमार यांनी विद्यार्थ्यांना संबोधित केले आणि त्यांना कोर्ट व्हिजिट, मूट कोर्ट, ॲडव्होकेट ऑफिस व्हिजिटचे महत्त्व समजावून सांगितले. त्यासाठीचे गुण आणि अहवाल कसे तयार करायचे समजावून सांगितले.

पुढील सत्रास सर्व संबंधित प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना संबोधित केले. प्राध्यापकांना त्यांच्या बॅचसह मूट ॲक्टिव्हिटी नियुक्त करण्यात आली होती.

**२ ऑगस्ट रोजी महाराष्ट्र विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनासाठी भेट :**

शिक्षक प्रा. कृष्णा कामत आणि प्रा. समता जोशी यांनी विद्यार्थ्यांना विधानसभा भेटीसाठी घेऊन गेले. सकाळी ११ ते १२ दुपारी विधानसभेचे कामकाज पाहण्यात आले आणि दुपारी १२.०० ते ७.०० सायंकाळी विधान परिषद कामकाज पाहण्यात आले.

**विधान सभा**

**वक्ता –** राहुल नार्वेकर

**मंत्री उपस्थित –** देवेंद्र फडणवीस, राधाकृष्ण विखे पाटील, छगन भुजबळ, दादा भुसे, हसन मुश्रीफ.

**विरोधी पक्ष –** बाळासाहेब थोरात, नाना पटोले, विजय वड्डेटीवार, यशोमती ठाकूर, रोहित पवार, अशोक चव्हाण, पृथ्वीराज चव्हाण.

**विधान परिषद**

**वक्ता –** निलम गोऱ्हे.

**सदस्य (सत्ताधारी पक्ष) –** शंभूराज देसाई, गुलाबराव पाटील, अब्दुल सत्तार, गिरीश महाजन, उदय सामंत, चंद्रकांत पाटील, अमोल मिटकरी.

**चर्चा**

- अवैध वाळू उत्खनन
- शैक्षणिक संस्थांची कार्यक्षमता जसे की ज्योती योजना, आदी विषयांवर विरोधी पक्षाकडून प्रश्न उपस्थित करण्यात आले.




**माजी विद्यार्थी भेट**

माजी विद्यार्थी सौ. चित्रा वाघमारे हेवनकर १९८०-८४ बॅच ज्यांनी अलीकडेच माननीय न्यायिक सदस्य NCLT अहमदाबाद म्हणून शपथ घेतली आहे, यांनी १९ ऑगस्ट २०२३ रोजी महाविद्यालयाला भेट दिली.



२७ ऑगस्ट २०२३ रोजी संस्कार भारती, ठाणे यांनी घेतलेल्या कथ्थक स्पर्धेत अंतिम वर्षाची विद्यार्थिनी कु. शलाका उतेकर हिने द्वितीय पारितोषिक पटकावले.




**दीक्षांत समारंभ**

मे २०२२ च्या १३९ विद्यार्थ्यांची LLB दीक्षांत पदवी प्रमाणपत्रे २१ ऑगस्ट रोजी प्राप्त झाली. पदवी प्रमाणपत्र मिळालेल्या विद्यार्थ्यांच्या विनंतीवरून.. प्राचार्य डॉ. श्रीविद्या जयकुमार यांनी पुढाकार घेऊन दिनांक २४ ऑगस्ट २०२३ रोजी दीक्षांत कार्यक्रमाचे आयोजन केले. यावेळी माजी जिल्हा सत्र न्यायाधीश श्री. भाटे यांना प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित करण्यात आले होते.

प्राचार्य डॉ. श्रीविद्या जयकुमार, विनोद वाघ, श्री. भाटे यांच्या हस्ते पदवीचे वितरण करण्यात आले. प्रा. हेतल मिशेरी यांनी कार्यक्रमाचे सूत्र संचालन केले आणि यश मिळविणाऱ्यांची नावे सांगितली. प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्रा. कृष्णा कामत यांनी करून दिला. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. विद्यार्थ्यांसाठी चहा-नाश्त्याची व्यवस्था करण्यात आली होती.

**तासिका तत्त्वावर शिक्षक नियुक्ती बाबत**

माननीय सहसंचालकांनी मंजूर केलेल्या तासिका तत्त्वावर शिक्षक नियुक्तीसाठी महाविद्यालयाचा प्रस्ताव सहसंचालक पनवेल यांच्याकडे सादर करण्यात आला आहे. बार कौन्सिल ऑफ इंडियाच्या आवश्यकतेनुसार आमच्याकडे १९ पूर्णवेळ शिक्षक असणे आवश्यक आहे. तथापि, ११ मंजूर शिक्षक पदांपैकी ९ रिक्त पदे

बाह्यशत्रूपेक्षा बऱ्याच वेळा अंतर्शत्रूचीच अधिक भीती असते.

भरण्यासाठी आम्हाला शासनाकडून एनओसी प्राप्त होत नाही. सरकार आता तासिका तत्त्वावरील शिक्षकांची नियुक्ती ७५०/- रुपये प्रति व्याख्यान ह्या नुसार करत आहे. त्या करिता शिक्षक LLM ५५%, NET किंवा SET किंवा Ph.D असावेत.

**जपानी शिष्टमंडळ भेट: २५ ऑगस्ट २०२३**

जपान क्योटो-सांग्यो विद्यापीठातील २ प्राध्यापकांसह २० विद्यार्थ्यांनी दुपारी ३.३० वाजता महाविद्यालयाला भेट दिली.

विधी महाविद्यालयातील कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी आमच्या पारंपरिक आरतीने त्यांचे मनापासून स्वागत केले. आमचे काही विद्यार्थी पारंपरिक महाराष्ट्रीयन नऊवारी साडी आणि धोतराच्या पोशाखात होते. विद्यार्थ्यांनी फुगडी, लंगडी, मार्बल्स (गोट्या), भवरा, विट्टी दांडू, मेहंदी, रांगोळी असे आमचे स्थानिक आणि सांस्कृतिक खेळ त्यांना दाखवले. विटी दांडू तयार झाला पण सभागृहात दाखवता आला नाही. जपानी विद्यार्थ्यांनी आमच्या विद्यार्थ्यांशी आनंदाने संवाद साधला आणि सर्व खेळ खेळण्याचा प्रयत्न केला. आमच्या विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने जपानी विद्यार्थ्यांच्या हातावर मेहंदीचे डिझाईन लावले होते. महाविद्यालयातर्फे त्यांना रांगोळी पावडर, स्टॅन्सिल, मेहंदी कोन, भवरा आणि पुरणपोळी ह्या भेटवस्तू दिल्या. या सुंदर अनुभवासाठी विद्या प्रसारक मंडळाचे आभार मानले.





**१५ ऑगस्ट २०२३ डॉ. व्ही. एन. बेडेकर स्मृती व्याख्यान सुश्री जान्हवी दादरकर : कायद्याच्या जगात भारताची भूमिका.**

सुश्री जान्हवी दादरकर, माजी सॉलिसिटर, यांनी महाविद्यालयाला भेट दिली, यांना यूके-इंडियातील टॉप १०० प्रभावशाली महिलांमध्ये सूचीबद्ध करण्यात आले होते. यूके-इंडिया सप्ताहादरम्यान India Inc २०१९ द्वारे प्रकाशित.

सर्व विद्यार्थी आणि कर्मचारी १ तासाच्या व्याख्यानात उपस्थित होते. त्यानंतर प्रश्नोत्तरे झाली. प्रा. कृष्णा कामत यांनी सूत्र संचालन केले. परदेशातील वकिलाशी संवाद साधण्याची ही दुर्मीळ संधी होती. आणि कायद्याचे तुलनात्मक विश्लेषण समजून घेण्यास ह्या व्याख्यानाची मदत झाली. महाविद्यालयातील १०० हून अधिक विद्यार्थ्यांनी ह्या व्याख्यानास आपली उपस्थिती दर्शविली.




चिंता ही कुठल्याच दुःखावरचा उपाय होऊ शकत नाही.

**२७ ऑगस्ट विधी स्टडी सर्कल आणि विधी बंध**

**विधीच्या विद्यार्थ्यांना न्यायाधीशांचे मार्गदर्शन : श्रीमती बी.एस. पाल, टी.एम.एफ.सी ठाणे**

विधी फाऊंडेशन व विधीबंध ठाणे आयोजित महिलांचे सक्षमीकरण यावर नुकतेच विधी महाविद्यालय, ठाणे येथे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. सदर व्याख्यानात प्रमुख वक्त्या म्हणून दिवाणी न्यायाधीश क. स्तर व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी श्रीमती बी.एस. पाल यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विधी फाऊंडेशनचे अध्यक्ष संजय म्हात्रे, तसेच विशेष अतिथी डॉ. श्रीविद्या जयकुमार मॅडम उपस्थित होत्या. सदर व्याख्यानमालेस टी.एम.सी. लॉ कॉलेज, मांजरा कॉलेज, एम. जी. एम., डी. वाय. पाटील, गुरुकुल इ. महाविद्यालयचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ''जेव्हा महिला स्वतंत्रपणे निर्णय घेऊ शकतील, तेव्हा त्यांचे सक्षमीकरण झाले, असे म्हणता येईल'', असे श्रीमती बी.एस. पाल मॅडम यांनी सांगितले. त्याचबरोबर न्यायिक अधिकारी होण्यासाठी कशा प्रकारे तयारी केली पाहिजे याविषयी देखील मार्गदर्शन केले. त्यानंतर उपस्थित विद्यार्थ्यांनी पाल मॅडमशी मनमोकळा संवाद साधला. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचलन ॲड. राज नलगे व माजी विद्यार्थिनी क्षितिजा खांगटे यांनी केले.






३० ऑगस्ट रोजी सत्र III, IV पुनर्मूल्यांकनाचे निकाल जाहीर करण्यात आले.

**३१ ऑगस्ट पी.एम-उषा योजना :**

केंद्र व राज्य शासनाच्या माध्यमातून चालविण्यात येणारी पीएम-उषा या योजनेचा लाभ घेण्यासाठी महाविद्यालयाने योग्य तो प्रस्ताव सादर केला. दिनांक ९ सप्टेंबर रोजी एसएनडीटी विद्यापीठामध्ये दाखल केलेल्या प्रस्तावाची छाननी करण्यात आली. यावेळी महाविद्यालयातर्फे प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जया कुमार व प्रा. विनोद वाघ उपस्थित होते. आवश्यक त्या कागदपत्राची पूर्तता यावेळी करण्यात आली.

**आमच्या महाविद्यालयातून २००९ ला उत्तीर्ण झालेली विद्यार्थिनी सौ. धनश्री सोलणकर ह्यांची सहाय्यक सरकारी वकील महाराष्ट्र सरकार १८ व्या क्रमांकावर निवड झाली.**



**विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन**

**''चंद्रयान'' महोत्सव**

दिनांक ९ सप्टेंबर २०२३ (१०.३० ते १) या वेळेत केले. सौ. गौतमी पुजारे या ''इन्स्टिट्युट इन्होव्हेशन सेल'' च्या अध्यक्षा आहेत. डॉ. कीर्ती आगाशे, डॉ. उषा राघवन, सौ. वैशाली जोशी व सौ. सुहासिनी

शुक्ल या विभागप्रमुखांनी स्पर्धेचे परीक्षण केले. तंत्रनिकेतनाचे प्राचार्य डॉ. डी. के. नायक यांच्या हस्ते बक्षिसे प्रदान करण्यात आली.






स्पर्धेच्या विजेत्यांचा तपशील पुढीलप्रमाणे :-

| क्र. | स्पर्धेचे नाव | क्रमांक (श्रेणी) | विद्यार्थ्यांचे नाव | विभाग |
|---|---|---|---|---|
| १ | वक्तृत्व स्पर्धा | १ | अलका दळवी | इन्फोरमेशन टेक्नॉलॉजी |
| | | २ | झीनत बानो | कॉम्प्युटर इंजिनिअरिंग |
| २ | कविता वाचन | १ | विनोद दानवे | इन्स्ट्रुमेन्टेशन |
| ३ | पॉवर पॉईंट प्रेझेन्टेशन | १ | समृद्धी हेदूलकर | कॉम्प्युटर इंजिनिअरिंग |
| | | २ | अक्षय जैसवार | इन्स्ट्रुमेन्टेशन |
| | | २ | सनी दळवी | इन्स्ट्रुमेन्टेशन |
| ४ | गायन | १ | श्रेयस पानसरे | इन्फोरमेशन टेक्नॉलॉजी |
| | | १ | आदेश गव्हाणे | कॉम्प्युटर इंजिनिअरिंग |
| | | २ | आर्य पवार | कॉम्प्युटर इंजिनिअरिंग |
| | | २ | हर्षदा साळुंखे | कॉम्प्युटर इंजिनिअरिंग |
| ५ | 'पोस्टर' | १ | रिया चांगण | इन्फोरमेशन टेक्नॉलॉजी |
| | | १ | सृष्टी डोंगरे | इन्फोरमेशन टेक्नॉलॉजी |
| | | २ | नीतिन जाधव | इन्स्ट्रुमेन्टेशन |
| | | ३ | अनुज गुरवे | कॉम्प्युटर इंजिनिअरिंग |
| ६ | मॉडेल मेकिंग | १ | यश पालकर | इन्स्ट्रुमेन्टेशन |
| | | २ | कुणाल निमारी<br>योगेश सुराडकर<br>यश कदम | इलेक्ट्रीकल पॉवर सिस्टीम |
| | | २ | हर्षल सोनकर<br>आदित्य शिंगरे<br>पार्थ लेकेश्री<br>यज्ञेश भोईर | इलेक्ट्रीकल पॉवर सिस्टीम |

दुसऱ्यांचे अश्रू थांबवावे, त्यांना हसवावे, या आनंदासारखा दुसरा आनंद नाही !

## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था, ठाणे

**ऑगस्ट २०२३ मधील कार्यक्रम / वार्ता**

३ ऑगस्ट : सहाय्यक प्रा. संदीप मोघे यांनी जर्नल क्लबमध्ये ''व्यवस्थापन शिक्षणातील कृत्रिम बुद्धिमत्तेची शक्ती'' या चित्तवेधक आणि समयोचित विषयावर सादरीकरण केले.




३१ जुलै - ५ ऑगस्ट : डॉ. दिनेश सोनकुल आणि डॉ. पंकज नांदूरकर यांनी  यु जी सी - एच.आर.डी.सी. व नागपूर विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ''इंडियन नॉलेज सिस्टीम'' या विषयावर आधारित अल्पकालीन प्राध्यापक प्रशिक्षण कार्यक्रमात भाग घेतला.

७ ऑगस्ट : सहाय्यक. प्रा. प्रथमेश उ. तावडे यांची विवेकानंद कला आणि वाणिज्य स्वायत्त महाविद्यालयाच्या बीबीए कार्यक्रमासाठी वैधानिक मंडळावर  सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली.

९ ऑगस्ट : डॉ. नीतिन जोशी, अँथॉलॉजी तर्फे आयोजित ''भारतीय उच्च शिक्षण पुनर्रचनेच्या संदर्भात कृत्रिम बुद्धिमतीची (AI) ची भूमिका'' या विषयावरील ऑनलाइन परिषदेला उपस्थित राहिले.



१० ऑगस्ट : सहाय्यक प्रा. विभूती सावे यांनी, आयईएस मॅनेजमेंट कॉलेज आणि संशोधन केंद्राचे माजी संचालक डॉ. दिनेश हरसोलेकर यांच्या मार्गदर्शनाखाली मुंबई विद्यापीठाचा पीएचडी कार्यक्रम यशस्वीपणे पूर्ण केला. ब्रिम्स तर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन !!

१० ऑगस्ट : डॉ. श्रीपाद बापट यांनी युनिसेफ आणि महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या वाय. इ. डब्लू. एस. (YEWS) उपक्रमासाठी हरित समन्वयक (ग्रीन कोऑर्डिनेटर) म्हणून पूर्ण दिवसाच्या प्रशिक्षण कार्यक्रमात सहभाग घेतला.

१० ऑगस्ट : डॉ. नीतिन जोशी यांनी रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीसोबत नवसंकल्पनांना (इनोव्हेशन) प्रोत्साहन देणाऱ्या प्रकल्पांसाठी सामंजस्य करार केला.




१० ऑगस्ट : विद्यार्थ्यांना पारंपरिक वर्ग शिक्षणा पलीकडे जाऊन शिकण्याचा अनुभव देण्याच्या उद्देशाने 'Management Mavericks' हा एक मजेदार व्यवस्थापन कार्यक्रम 'विद्यार्थी विकास समिती' तर्फे आयोजित करण्यात आला, यामुळे विद्यार्थ्यांना नियोजन, सांघिक कार्य, मल्टी-टास्किंग आणि ग्रुप डायनॅमिक्स विकसित करण्यास मदत होईल. डॉ. कांचन आणि सहाय्यक सहा.प्रा. सिद्धेश व सहा.प्रा. कृष्णकांत यांनी यासाठी ६ प्रकारच्या विविध व्यवस्थापन खेळांचे उपक्रम आयोजित करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.





१० ऑगस्ट : डॉ. स्मिता जपे यांनी एमएमएस वित्त शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी ''वेल्थ मॅनेजमेंट'' या विषयावर, फिन एक्स, सी आय इ एल चे संचालक श्री. निकुंज शर्मा यांचे एक सत्र आयोजित केले.




१३ ऑगस्ट : सहाय्यक प्रा. संदीप मोघे यांनी इंटरनॅशनल टीचिंग ऑलिम्पियाड थीम: आयसीटी इन एज्युकेशन ऑनलाइन प्रश्नमंजुषा १००/१०० गुणांसह यशस्वीरीत्या पार केली.

१५ ऑगस्ट : सहाय्यक. प्रा. प्रथमेश उ. तावडे यांनी स्किल इंडिया डिजिटल द्वारे आयोजित 'एआय फॉर इंडिया २.०' या विषयावर ऑनलाइन कौशल्य अभ्यासक्रम पूर्ण केला.

१५ ऑगस्ट : सहाय्यक. प्रा. संदीप मोघे यांनी ''टिचिंग विथ आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) इन क्लास रूम'' या विषयावरील ऑनलाइन अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण केला.

१६ ऑगस्ट : व्यवसाय उत्कृष्टता पुरस्कारासाठी डॉ. नीतिन जोशी यांना गोदरेज कंपनी तर्फे कंपनीच्या व्यावसायिक विभागाचे मूल्यांकन करण्यासाठी आमंत्रित करण्यात आले.

१७ ते २५ ऑगस्ट : डॉ. पल्लवी चंदवास्कर यांनी एमएमएस २०२३-२५ तुकडीसाठी ''एम्पॉवरिंग थ्रू टेक्नॉलॉजिकल इनोव्हेशन'' या विषय सूत्रावर आधारित ८ दिवसांच्या अभिमुखता (फाऊंडेशन) कार्यक्रमाचे आयोजन केले. कार्यक्रमाच्या उदघाटन सत्रामध्ये डॉ. नीतिन जोशी यांनी नव्या तुकडीचे स्वागत केले व प्रमुख पाहुणे डॉ. ए. सी. सुखठणकर यांनी नवीन विद्यार्थ्यांना संबोधित केले. ब्रिम्स मधील एम एम एस अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांना आवश्यक अशा सर्व पायाभूत विषयांवरील तज्ज्ञांची व्याख्याने, कार्यरत समित्या, सुविधा याबद्दलची सुमारे २० हून अधिक माहिती सत्रे, आणि उपक्रम असलेला असा कार्यक्रम नवीन तुकडीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आला.




१८ ऑगस्ट : आयआयसी समितीने एमएमएस २०२३-२५ तुकडीसाठी अभिमुखता सत्र आयोजित केले.

यामध्ये समिती तर्फे १. उत्कट निरीक्षण क्षमता. २. विवेचनात्मक विचारप्रक्रिया ३. निर्मितीक्षमता या तीन प्रमुख कौशल्यांवर भर देणारे उपक्रम आयोजित करण्यात आले.



२१ ऑगस्ट : माइंडस्टिक्स तर्फे श्री जयंत कुलकर्णी, यांनी ब्रिम्सच्या InnoSIP स्पर्धेसाठी दिलेल्या प्रायोजकतेबद्दल ब्रिम्स कृतज्ञता व्यक्त करत आहे.

२१ ऑगस्ट : आय आय सी (IIC) समितीने ''लीन स्टार्ट अप'' आणि ''किमान व्यवहार्य उत्पादन/व्यवसाय'' यावर एक सत्र आयोजित केले. सिमेंट आणि स्टील उद्योगातील ३० वर्षांहून अधिक अनुभव असलेले मार्केटिंग व्यावसायिक श्री. अभय पाटणकर यांनी लीन स्टार्टअप पद्धती आणि व्यवसाय विकासातील किमान व्यवहार्य उत्पादन (MVP) चे महत्त्व, ग्राहक, यशस्वी उद्योजकीय प्रयत्नांसाठी केंद्रित दृष्टीकोन इत्यादी संदर्भात मार्गदर्शन केले.

२२ ऑगस्ट : एमएमएस २०२३-२५ तुकडीच्या फाऊंडेशन कार्यक्रमात सहा.प्रा.संदीप मोघे यांचे ''व्यवस्थापन शिक्षणातील कृत्रिम बुद्धिमत्तेची भूमिका'' या विषयावर संवादात्मक सत्र झाले.



२३ ऑगस्ट : **डॉ. व्ही. एन. ब्रिम्स येथे जपानी विद्यार्थ्यांसोबत सांस्कृतिक देवाणघेवाण कार्यक्रम –** विद्याप्रसारक मंडळाच्या सांस्कृतिक देवाणघेवाण कार्यक्रमा अंतर्गत भारत दौऱ्यावर आलेल्या जपानी विद्यार्थ्यांसाठी विद्यार्थी विकास समिती (SDC) तर्फे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात जपानी विद्यार्थ्यांसाठी जन्माष्टमी, रचना बांधणे, पिक्शनरी पझल चॅलेंज, रिंग गेम आणि मातीच्या गणेश मूर्ती तयार करणे अशा विविध आकर्षक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांच्या माध्यमातून सहभागींमध्ये सांस्कृतिक संवाद, सर्जनशील अभिव्यक्ती आणि सहयोगी सहभागासाठी एक व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले.




२३ ऑगस्ट : आय आय सी (IIC) समितीने सुरुवातीच्या टप्प्यातील उद्योजकांसाठी ''एंजल इन्व्हेस्टमेंट व्ही सी फंडिंग अपोर्च्युनिटीस'' या विषयावर एक सत्र आयोजित केले. फिनोमाइंड्स ग्लोबल ॲडव्हायझर्स चे संस्थापक आणि यूएसए व्यावसायिक फसवणूक परीक्षक श्री. हर्ष व्होरा यांनी विद्यार्थ्यांना एंजल इन्व्हेस्टमेंट, व्हेंचर कॅपिटल फंडिंग योग्य गुंतवणूकदार ओळखणे आणि वाटाघाटी प्रक्रिया अशा अनेक बाबींसंदर्भात मार्गदर्शन केले.




२४ ऑगस्ट : प्रा. दीप्ती पेरीवाल यांनी डॉ. स्मिता जपे, डॉ. पल्लवी चंदवास्कर, डॉ. विभूती सावे, सहा. प्रा. सिद्धेश सोमण, सहा. प्रा. प्रथमेश तावडे, डॉ. पंकज नांदूरकर यांच्यासह बॉम्बे स्टॉक एक्स्चेंजला औद्योगिक भेट; तसेच भांडवली बाजारावर आधारित ४ दिवसीय प्रशिक्षण सत्राचे आयोजन केले. या कार्यक्रमात सुमारे ९० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.




२५ ऑगस्ट : अंधेरी येथील रेडिसन तर्फे आयोजित मूल्यमापन केंद्र विकसित करण्याच्या सत्रामध्ये डॉ. नीतिन जोशी यांनी सहभाग घेतला.

२५ ऑगस्ट : विद्यार्थी विकास समिती (SDC) तर्फे नवीन एमएमएस २०२३-२५ तुकडीच्या विद्यार्थ्यांसाठी, सांघिक कौशल्यांना चालना देण्यासाठी, पास द रिंग, अडथळे खेळ आणि रिले रेस यासारख्या मजेदार उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. डॉ. कांचन, सहा. प्रा.सिद्धेश आणि सहा. प्रा. कृष्णकांत लुसुणे यांनी या खेळाच्या माध्यमातून मिळणारे व्यवस्थापनाचे धडे आणि शिकवणी बद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.



२५ ऑगस्ट : आयक्यूएसी (IQAC) समितीने IQAC स्थापना दिनाचे आयोजन केले. या निमित्ताने एमएमएस विद्यार्थ्यांसाठी "Extempore" स्पर्धा आयोजित करण्यात आली. या कार्यक्रमात प्रथम सत्राचे १२ विद्यार्थी आणि द्वितीय सत्राचे ३ विद्यार्थी सहभागी झाले होते. याव्यतिरिक्त, एमएमएस च्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठीच्या प्रश्नमंजुषा देखील घेण्यात आली.

२५-२८ ऑगस्ट : डॉ. स्मिता जपे यांना एशियन जर्नल ऑफ ॲग्रिकल्चरल एक्स्टेंशन, इकॉनॉमिक्स ॲंड सोशिऑलॉजी या नियतकालिक तर्फे ''भारतातील सूक्ष्म वित्त आणि महिला सक्षमीकरण'' या विषयावरील शोध-निबंधाचे समीक्षण करण्यासाठी आमंत्रित करण्यात आले.

२६ ऑगस्ट : डॉ. नीतिन जोशी कस्टमर सेंट्रिसिटी या विषयावरील कार्यक्रमात सहभागी झाले.



२६ ऑगस्ट : डॉ. नीतिन जोशी यांना पुस्तक प्रकाशनासाठी प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित करण्यात आले.




## महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालय, वेळणेश्वर

दिनांक ०३ ऑगस्ट २०२३ रोजी महाविद्यालयातील स्थापत्य अभियांत्रिकी विभागातर्फे आणि Innovation and Incubation Cell अर्थात IIC यांच्या संयुक्त विद्यमाने "Lean Startup and Minimum Viable products/ business" या विषयावर एकदिवसीय ऑनलाईन वेबिनार पार पडले. यावेळी एपेक्स कन्सल्टन्सीचे संस्थापक आणि सीईओ श्री. प्रशांत पाटील यांना व्याख्यानासाठी संसाधन व्यक्ती म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. आदरणीय वक्त्याने Lean Startup बद्दल त्यांचे ज्ञान शेअर केले. नवीन व्यवसाय सुरू करण्यासाठी मूलभूत

गरजांची सर्व माहिती त्याचबरोबर नागरी बांधकाम सुरू करण्यासाठी सरकारने केलेल्या सर्व नियमांची माहितीही त्यांनी यावेळी विषद केली.




दिनांक ०४ ऑगस्ट २०२३ रोजी महाविद्यालयात 'मैत्री सप्ताह' साजरा करण्यात आला. यावेळी मैत्रीवर अनेक विद्यार्थ्यांनी आपआपली मते व्यक्त केली. त्याचसोबत काही विद्यार्थ्यांनी कविता वाचन केले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व विद्यार्थ्यांनी आपल्या मित्रांना फ्रेंडशिप बँड बांधून मिठाईचे वाटप केले.

दिनांक ०९ ऑगस्ट २०२३ रोजी महाविद्यालयातील विविध विभागाने 'मेरी माटी, मेरा देश: पंचप्राण प्रतिज्ञा' समारंभ आयोजित केला होता. यावेळी आजादी का अमृत महोत्सव आणि देशाच्या विकासात अभियंत्यांची भूमिका यावर भर देऊन सर्वांना उद्‌बोधित करण्यात आले. Directorate of technical education यांनी त्यांच्या पत्रात उल्लेख केल्याप्रमाणे सर्व शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी पंचप्राण शपथ घेतली. सर्व विभागांनी आपापल्या विभागात ही शपथ घेतली. सर्व विभागांमधे ही शपथ प्रोजेक्टवर दाखवली गेली.

दिनांक १२ ऑगस्ट २०२३ रोजी इलेक्ट्रॉनिक्स आणि दूरसंचार तसेच उपकरण अभियांत्रिकी विभागातर्फे ''दूरसंचार क्षेत्रातील मायक्रोवेव्ह अभियांत्रिकीची भूमिका'' या विषयावर ऑनलाईन व्याख्यान आयोजित करण्यात आले. कार्यक्रमासाठी तज्ज्ञ व्याख्याते म्हणून डॉ.के.इंधुमती यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

दिनांक १४ ऑगस्ट २०२३ रोजी महाविद्यालयात मेकॅनिकल अभियांत्रिकी विभाग आणि IIC यांच्या संयुक्त विद्यमाने 'चांद्रयान ३' या विषयावर अतिथी व्याख्यान संपन्न झाले. चांद्रयान ३ बद्दल तांत्रिक माहिती, भारतीय अंतराळ संशोधन संस्था अर्थात इस्रो आणि अंतराळ विभागात झालेली प्रगती या विषयांवर या लेक्चरमधे भर दिला गेला. या कार्यक्रमाचे व्याख्याते श्री. सुरेंद्र वैद्य हे या विषयातील तज्ज्ञ म्हणून उपस्थित होते. ते गोदरेज कंपनीत सल्लागार पदावर कार्यरत आहेत. गोदरेज एरोस्पेस येथे executive vice president आणि बिझनेस हेड या पदांवरही त्यांनी काम पाहिले आहे. यावेळी महाविद्यालयातील विविध विभागांचे विद्यार्थी आणि शिक्षक अशा एकूण ६० हून अधिक लोकांनी या कार्यक्रमात सहभाग नोंदवला.

दिनांक १५ ऑगस्ट २०२३ रोजी देशाचा सर्वोच्च राष्ट्रीय सण अर्थात स्वातंत्र्यदिन महाविद्यालयात साजरा झाला. महाविद्यालयाचा संपूर्ण परिसर स्वातंत्र्य, एकता आणि देशाभिमानाच्या उत्साहाने दुमदुमून गेला. भारताचा ७६ वा स्वातंत्र्य दिन समस्त विद्यार्थी, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी यांनी एकत्र येऊन साजरा केला. कार्यक्रमाच्या सुरवातीला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा दलाचा स्वयंसेवक सोहेब तडवी याने संचलन केले. महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या हस्ते भारताचा तिरंगा फडकवण्यात आला. देशाच्या विकासकार्यात प्रत्येक देशवासियांची, मुख्यत्वे विद्यार्थ्यांची भूमिका यावर भर देऊन प्राचार्यांनी सर्वांना मार्गदर्शन केले. स्वातंत्र्याचं महत्त्व आणि अनेक वीरांनी दिलेलं बलिदान याबाबत अनेक शिक्षकांनी आपले विचार मांडले. देश-कर्तव्य, देशभक्ती आणि जबाबदारी याची मुलांना जाणीव करून देण्याच्या दृष्टीने हा कार्यक्रम महत्त्वाचा ठरला.



दि. १७ ऑगस्ट २०२३ रोजी महाविद्यालयातील मेकॅनिकल अभियांत्रिकी विभाग आणि Innovation and Incubation Cell अर्थात IIC यांच्या संयुक्त विद्यमाने 'Incubation and accelerators in Innovation and startups' या विषयावरील अतिथी व्याख्यान आयोजित करण्यात आले. Incubators आणि accelerators चा नावीन्यपूर्ण उपक्रमात आणि नवीन उद्योगात कसा वापर होऊ शकतो याची माहिती देणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. Banglore software park of India चे COO head COE, STPI next initiatives, श्री. प्रदीप ढगे हे या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे होते. या कार्यक्रमासाठी ऑनलाईन व ऑफलाईन माध्यमातून ९० हून अधिक यंत्र अभियांत्रिकी व इतर विभागातील इच्छुक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

दि. २२ ऑगस्ट २०२३ रोजी महाविद्यालयातील महिला विकास समिती तर्फे श्रावण मासाचे औचित्य साधून महाविद्यालयात मंगळागौर कार्यक्रम साजरा करण्यात आला. यावेळी मोठ्या संख्येने विद्यार्थिनी व महिला कर्मचारी यांनी यामध्ये सहभाग घेतला.





दि. २८ ऑगस्ट २०२३ रोजी महाविद्यालयाला जपान देशातील २२ विद्यार्थी आणि त्यांचे २ अध्यापक यांनी भेट दिली. यावेळी महाविद्यालयाकडून या जपानी विद्यार्थ्यांसाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. आपले कोकण, कोकणातील स्थानिक सणवार, रीती-रिवाज, मराठी संस्कृती आणि भारतीय परंपरा यांचे ओझरते दर्शन या विद्यार्थ्यांना करून देण्याचा प्रयत्न प्रभावीपणे केला. यावेळी सर्वप्रथम जपानी विद्यार्थ्यांना रांगोळी म्हणजे काय हे जपानी भाषेतूनच सांगण्यात आलं आणि त्या सर्वांना रांगोळी काढायला शिकवली गेली. महाविद्यालयातीलच विद्यार्थिनी आणि प्राध्यापिका त्यांना रांगोळी शिकवण्यात उत्साहाने सहभागी झाल्या होत्या. जपानी विद्यार्थ्यांनीही यावेळी रांगोळी काढण्याचा अगदी मनमुराद आनंद लुटला. त्यानंतर त्यांना सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून 'कोकणातला गणेशोत्सव' दाखवला गेला. स्थापत्य अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी यावेळी गणपतीची पार्थिव मूर्ती घेऊन अगदी वाजतगाजत मिरवणूक काढली, आरत्या केल्या, प्रसादवाटप केले. त्यानंतर विद्युत अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी पालखीनृत्य सादर केले. अशा प्रकारे कोकणातले दोन मोठे उत्सव 'गणपती' आणि 'शिमगा' यांचे ओझरते पण सुंदर दर्शन यावेळी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी पाहुण्यांना घडवले.



दि. ३१ ऑगस्ट २०२३ रोजी महाविद्यालयातील इलेक्ट्रॉनिक्स आणि दूरसंचार विभागातील प्राध्यापकांना श्री. मुकुंद दर्भे आणि श्री. रमेश जकाती (माजी बीएआरसी शास्त्रज्ञ) यांनी विज्ञान आणि संशोधनावर मोलाचे मार्गदर्शन करून प्राध्यापकांना उच्च शिक्षण घेण्यास प्रोत्साहित केले. या दरम्यान विद्यार्थ्यांच्या प्रकल्पांवर सुद्धा सविस्तर चर्चा करण्यात आली.



•••

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006


# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- ❉ अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- ❉ वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- ❉ वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❉ संपर्क ❉**

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०

Email : vpmt1935@gmail.com


हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.